रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २३५ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in



‘जेएसडब्ल्युच्या जहाजांमुळे खारलँड्चे नुकसान’

पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ मंगळवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹



‘आयपीएल’चे प्लेऑफचे सामने

पान ८ वर

# ऑफलाईन परीक्षांना विद्यार्थ्यांचा विरोध

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

*दहावी आणि बारावीच्या ऑफलाईन परीक्षांना विद्यार्थ्यांकडून विरोध होताना दिसत आहे. मुंबई, नागपूर, औरंगाबाद व उस्मानाबाद, पुणे आणि अकोल्यासह काही ठिकाणी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. त्यामुळे आता पुन्हा एकदा राज्य सरकारसमोर आव्हान निर्माण होणार असल्याची शक्यता आहे. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनी मुंबई, पुणे, नागपुरसह अन्य काही शहरांत गर्दी केली.*

**॥ शिक्षणमंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन**

**॥ पोलिसांचा लाठीचार्ज**

सोमवारी मुंबईत विविध भागातून विद्यार्थी धारावीत जमले व त्यांनी आंदोलनास सुरूवात केली. पोलीस प्रशासन या विद्यार्थ्यांना नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून, विद्यार्थी ऐकण्याच्या मनस्थितीत दिसत नसल्याने, पोलिसांना बळाचा वापर करावा लागला आहे. शाळा जर ऑफलाईन असत्या तर परीक्षा ऑफलाईन घरण्यास हरकत नाही. मात्र, ऑनलाइन शाळा घेऊन ऑफलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना पटलेला नाही.



*“परीक्षा घेत असताना आम्ही सर्व बाबींचा विचार करत आहोत. संघटनांनी मुलांना रस्त्यावर आणणे योग्य नाही. काही गोष्टी बोलायच्या असतील तर ते आमच्याशी चर्चा करू शकतात. आम्ही चर्चा करण्यासाठी पूर्णपणे तयार आहोत. त्यानुसार आम्ही शिक्षण तज्ज्ञांशी देखील चर्चा करू. विद्यार्थ्यांच्या काही सूचना असतील तर त्या ऐकण्यासाठी सरकार व शिक्षण विभाग तयार आहे.*

*– वर्षा गायकवाड, शिक्षणमंत्री*

## खारेपाटात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणार



आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

आगरी समाज आणि रायगडचा शैक्षणिक विकास ना.ना.पाटील यांनी केला आहे. तीच परंपरा आपल्याला पुढे चालवायची आहे. त्याच दृष्टीकोनातून खारेपाटात चांगल्या दर्जाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करायच्या आहेत असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी केले. खारेपाटातील नारंगी ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या वास्तूचे उद्घाटन आ. जयंत पाटील यांच्या •➤ पान ५ वर

## पुन्हा शाळेची घंटा वाजली

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

कोरोनाच्या तिसर्‍या लाटेचा प्रभाव कमी होत असल्याने सोमवारपासून पुन्हा एकदा रायगड जिल्ह्यातील शाळांची घंटा वाजली आहे. चालू शैक्षणिक वर्षासाठी रायगड जिल्ह्यात शासकीय आणि खाजगी अशा एकूण तीन हजार ६८७ शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण पाच लाख १७ हजार ६६७ विद्यार्थी असून एकूण वीस हजार १६९ शिक्षण आहेत.

कोरोनाच्या तिसर्‍या लाटेच्या भीतीमुळे शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सहा जानेवारीपासून रायगड जिल्ह्यातील शाळा बंद झाल्या होत्या. मात्र कोरोनाच्या तिसर्‍या लाटेचा प्रभाव कमी होऊ लागला आहे. त्यामुळे २८ जानेवारी रोजी जिल्हा •➤ पान ५ वर

## २०१६ पासून देशात ६० हजार नवे स्टार्टअप



### अभिभाषणात विकासाच्या अजेंड्यावर भर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वार्षिक अर्थसंकल्पाची घोषणा आज होणार असून देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी स्टार्टअपसंदर्भातील माहिती जाहीर केली आहे. भारतात २०१६ पासून साठ हजार नवे स्टार्टअप सुरु झाले आहेत आणि यापासून जवळपास ६ लाख नवीन रोजगाराची निर्मिती झाली आहे असे राष्ट्रपती रामनाथ •➤ पान ५ वर

### आर्थिक विकास दर ८ टक्के


**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली असून पहिल्या दिवशी आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अभिभाषणानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. यात त्यांनी चालू आर्थिक वर्षात जीडीपी ९.२ टक्के •➤ पान ५ वर

## नितेश राणेंचा आज फैसला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



भाजप आमदार नितेश राणे यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सोमवारी सिंधुदुर्ग जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी घेण्यात आली. यावेळी न्यायालयानं दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतला. त्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला असून आज दुपारी ३ वाजता निकाल देण्यात येणार आहे.







# चिंतामण पवार यांचे उपोषण स्थगित

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

भेरव येथील शेतकरी चिंतामण शंकर पवार हे दि.२४ जानेवारी पासून सुधागड सुधागड तहसील कार्यालयाच्या आवारात आपल्या प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषणास बसले होते. पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

विकासक पागुर योगेश देसाई यांनी मौजे आवंढे हद्दीतील शेतकरी चिंतामण शंकर पवार यांच्या मालकी हक्काच्या जमिनीत बंगले बांधून अतिक्रमण केले आहे. त्या संदर्भात शेतकरी चिंतामण पवार यांनी याआगोदर देखील दोन उपोषणे करून आपल्याला न्याय मिळावा अशी मागणी जिल्हा व तालुका प्रशासनाकडे केली होती. प्रशासनाने काही प्रश्न मार्गी लावले. परंतु विकासक पागुर देसाई यांनी जे प्रतिज्ञापत्र केले आहे ते निखालस खोटे असून या प्रतिज्ञापत्राद्वारेच शासनाची व न्यायालयाची देसाई हे दिशाभूल करीत असल्याने शेतकरी पवार हे पुन्हा एकदा उपोषणास बसले होते.

सुधागड तालुक्याचे तहसीलदार दिलीप रायन्नावर यांचे यशस्वी मध्यस्थीने विकासक पागुर देसाई यांनी शेतकरी यांचे बरोबर चर्चेची तयारी दर्शविली. तर प्रतिज्ञापत्राची आम्ही कार्यालयामार्फत सखोल चौकशी करू असे लेखी आश्वासन दिल्याने शेतकरी चिंतामण पवार यांनी आपले उपोषण स्थगित केले. या उपोषणाकरिता राहुल सोनावळे, रवींद्रनाथ ओव्हाळ, भगवान शिंदे, आदेश कांबळे, सतीश गायकवाड, हेमंत गायकवाड, ॲड.सुशील गायकवाड, विवेक रोकडे, राहुल कांबळे, मनोज साळुंखे, सिद्धांत गायकवाड, प्रशांत वाघमारे, दिलीप मोरे तसेच पक्षाचे युवक, महिला कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १ फेब्रुवारी

१) श्रीम.तारामती हरिश्चंद्र पाटील, मातृछाया, तळ्याजवळ, मु.पो. कुरूळ ता.अलिबाग
१ फेब्रुवारी १९३७

२) श्री.शौकत इब्राहीम पठाण पारिजात, सो चेंढरे, अलिबाग
१ फेब्रुवारी १९४७

३) रमेश पांडरंग कंटक मु.पो.बेलकडे, ता.अलिबाग
१ फेब्रुवारी १९५१

४) श्री. प्रभाकर हरी तांडेल श्रीबाग-२ अलिबाग
१ फेब्रुवारी १९४६

५) श्रीमती कृष्णबाई वामन म्हात्रे श्रीगाव-अलिबाग
१ फेब्रुवारी १९४४

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता.अलिबाग, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक शाम हिराजी भाटकर व दत्तात्रेय शंकर भाटकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे सातिर्जे, ता.अलिबाग गट नं.१५७/१ क्षेत्र ०-६६-००, पो.ख.०-०७-८०, आकार १०.३७ पैसे वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी उत्तर दिशेकडील ०-४८-० गुंठे क्षेत्र मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**अलिबाग**
दि.०१.०२.२०२२

**मिलिंद चव्हाण**
ॲडव्होकेट
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३ अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल चित्रिता बागची यांना मौजे-मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ७१ | ३ | १-३४-०० पैकी विक्रीस क्षेत्र ०-६१-०० | ०रू-५६ पैसे, |

वरील शेतजमिन मिळकतीचे विद्यमान मालक मे.आकाश फार्मस प्रा.लि., रा.मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून रजिस्टर्ड दस्तऐवजाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीच्या विद्यमान मालक व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. वर वर्णन केलेल्या मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तर वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्नवस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क तसेच अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दि.०१/०२/२०२२

**ॲड.वसंत गोविंद रवणे.**
रा.माऊली को.हा.सो.,फ्लॅट नं.१०४,पहिला मजला.'ए' विंग, विठ्ठल नगर कर्जत, जि.रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक, ता.रोहा
## निविदा सूचना

दिनांक : ३१/०१/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक हद्दीतील खालील विकास कामे १५ वा वित्त/ग्रामनिधी आयोग ग्रामपंचायत स्तर निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकात मा.उपभियंता (बांधकाम) उपविभाग रोहा, यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून सदर कामे करणेसाठी नोंदणीकृत निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा सादर करणेची अंतिम दिनांक | वेळ निविदा फॉर्म फी | कोरे | १%घसारा रक्कम | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरेबुद्रुक येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | २९९९७७/- | १५/०२/२०२२ | ४.०० | २००/- | १%घसारा | ३ महिने | |
| २ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व आरेबुद्रुक | १७१४७०/- | १५/०२/२०२२ | ४.०० | २००/- | १%घसारा | ३ महिने | |
| ३ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन आरेखुर्द, | २२३१७१/- | १५/०२/२०२२ | ४.०० | २००/- | १%घसारा | ३ महिने | |
| ४ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन कुंभोशी | १२८६०२/- | १५/०२/२०२२ | ४.०० | २००/- | १%घसारा | ३ महिने | |

१.कामाचे अंदाजत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील आवश्यक फी भरून त्याची प्रत उपलब्ध केले जातील.
२.प्राप्त निविदा दि.१८/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांचे समक्ष मा.सरपंच यांचे उघडण्यात येतील.
३.निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्ट्रेशन दाखले हे सत्य प्रत केलेले असावे.
४.कोणताही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.
५.देयकातून शासन नियमाप्रमाणेच आयकर व उपकरणाची कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांचे कडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीने अधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणे असून काम समाधानकारक नसेल तर त्याचस्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६.काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यानंतर देखभाल दुरूस्ती संबंधित ठेकेदार यांनी करणेची असून त्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७.उपलब्ध निधी प्रमाणे रक्कम अदा केली जाईल.
८.निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशीरा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
९.निविदामध्ये दिलेल्या कामांचे अंदाजपत्रका प्रमाणे ३०% रक्कम ग्रामपंचायतीकडे सदरची रक्कम जमा झाल्यानंतर देण्यात येईल. तसेच ३०% रक्कम जमा न झाल्यास सदरची रक्कम परतावा करण्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक**
**ता.रोहा जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक**
**ता.रोहा जि.रायगड**

## श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन
### रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन
### ता.श्रीवर्धन जिल्हा-रायगड
(I.S.O.9001: 2015 प्रमाणित)

SHRIVARDHAN MUNICIPAL COUNCIL — स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेलः shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/आवि/कात-१०/जाहीर निविदा ०९/१३०२/२०२१-२२ दिनांक ३१/०१/२०२२

**(आरोग्य/विद्युत/अग्निशमन/पाणीपुरवठा विभाग) जाहिर निविदा सूचना क्र. /२०२१-२२**

श्रीवर्धन नगरपरिषद इच्छूक ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून इच्छुक ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दोन लिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी (रूपये) | इसारा रक्कम (रूपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीवर्धन नगरपरिषद घनकचरा प्रकल्प येथे ओल्या कचऱ्यावर मारणेसाठी कल्चर पावडरचा पुरवठा करणे | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०२ | श्रीवर्धन नगरपरिषदेकरीता सार्वजनिक भिंती/शाळेच्या भिंती स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जनजागृती करणेसाठी रंगरंगोटी करणे. | १०००/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०३ | श्रीवर्धन शहरातील विविध चौकांमध्ये तसेच मार्केट परिसरामध्ये (Twin Bin) खरेदी करणे. | ७५०/- | ५०००/- | ३ महिने |
| ०४ | श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीमध्ये फॉगींग मशिनद्वारे फवारणी करणे. | १०००/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०५ | श्रीवर्धन नगरपरिषद आरोग्य विभागाकरीता सफाई सामान पुरवठा करणे | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०६ | श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील शौचालयाच्या टाक्या सफाई करणे. | ७५०/- | २०००/- | १ वर्षे |
| ०७ | श्रीवर्धन नगरपरिषद अग्निशमन वाहनासाठी लागणारे साहित्य व कर्मचाऱ्यासाठी लागणारे साहित्य पुरवठा करणे. | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०८ | श्रीवर्धन नगरपरिषद विद्युत विभागाकडील विविध कामे करणेसाठी हायड्रा पुरवठा करणे. | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| ०९ | श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील कार्यरत विविध मोटर्स, पंप व मशिन्स यांची देखभाल दुरूस्ती करणे. | ७५०/- | २०००/- | १ वर्षे |
| १० | श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयातील एसी खरेदी देखभाल व दुरूस्ती करणे. | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| ११ | श्रीवर्धन नगरपरिषदेस मंडप/खुर्च्या/स्पिकर/टेबल/लायटींग इत्यादी पुरवठा करणे. | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| १२ | श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयातील ६३ केव्हीए जनरेटर व कार्यालयातील इन्व्हेटर व बॅटरी यांची देखभाल दुरूस्ती व पुरवठा करणे. | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| १३ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत श्रीवर्धन शहरातील विविध ठिकाणी हवेची गुणवत्ता तपासणी करणे.(Amblent air quality monitoring) | ७५०/- | ५०००/- | १ वर्षे |
| १४ | श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत GPS यंत्रणा वापरून (Normal & Heritage) वृक्षगणना करणे. | ७५०/- | ५०००/- | ६ महिने |
| १५ | श्रीवर्धन नगरपरिषद विद्युत विभागाकडील देखभाल दुरूस्ती कामाकरीता आवश्यक यंत्रणा पुरविणे. | १०००/- | ७७४८/- | १ वर्षे |

**अटी व शर्ती**

१) विहित नमुन्यातील सर्व अटी व शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०१/०२/२०२२ ते १०/०२/२०२२ पर्यंत कामकाजाचे दिवशी निविदा फॉर्म फी रक्कम नगरपरिषद कार्यालयात भरणा करून निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करून घेता येतील. २)विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात दिनांक ०१/०२/२०२२ ते १०/०२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात दाखल करता येतील. ४) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ११/०२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषदेच्या मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यांत येईल. ५) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे निविदा फॉर्ममध्ये नमूद करणेत आलेली आहेत. ६) उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ७) इसारा रकमेचा राष्ट्रियीकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट)/बँकर्स चेक प्रत्येक कामाचे तांत्रिक बोलीचे लिफाफ्यामध्ये निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.(किंवा सदरची इसारा रक्कम नगरपरिषदेकडे भरणा करून त्याची पावती निविदेसोबत सादर करावी.) ८) सही नसलेली व अटी अगर शर्तीची निविदा स्वीकारली जाणार नाही. ९) निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल. १०) पुरवठा करणेत येणारी साहित्य स्पेसिफिकेशनप्रमाणे मान्यताप्राप्त कंपन्यांचे पुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. ११) भाववाढीचे कलम कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही १२) मंजूर झालेल्या ठेकेदारांची इसारा रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून गृहित धरणेत येईल. सदर निविदेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यानंतर इसारा रक्कम परत केली केली जाईल. १३) निधीच्या उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा करण्यात येतील. १४) कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे, नाकारणे अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तींना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा ठेका कंपनींना व त्यांचेशी संबंधित व्यक्तींना नगरपरिषदेकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधीत्व करता येणार नाही.

सही/-
**(विराज लबडे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**श्रीवर्धन नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गौरकामथ, ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक मंगला आर वैद्य यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्रफळ(आर.चौ.मी) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| २८ | ३ | ३.७७.१७ | ३८.०० |

वर वर्णन केलेल्या बिनशेती प्लॉट मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०१/२०२२

**ॲड.महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८८१८५८६५४

खरेदीदारः
१) धीरज धर्मा मो.नं.९७४०४७१००३
२) पंकज केजरीवाल मो.नं.८८८४९२२४३५

## म्हसळा नगरपंचायत, म्हसळा
### नमुना-'ब-१' जोडपत्र
**रायगड जिल्ह्यातील म्हसळा, नगरपंचायत उपाध्यक्ष पदाचा निवडणूक कार्यक्रम व विशेष सभा कामकाज**

| | | अधिकारी यांचे नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र ज्या अधिकाऱ्याकडे दाखल करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे ठिकाण | श्री.मनोज उकिर्डे,मुख्याधिकारी म्हसळा नगरपंचायत | म्हसळा नगरपंचायत ता.म्हसळा, जि.रायगड |
| २ | नामनिर्देशन देणे व स्वीकारणेचा दिनांक/वेळ | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंत | |
| ३ | पिठासिन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) (अध्यक्ष पदाची निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर) | |
| ४ | वैधपणे नामनिर्देशन झालेल्या उमेदवारांची नावे वाचून दाखवणे | नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर | |
| ५ | उमेदवारी मागे घेणे | अ.क्र.४ प्रमाणे नावे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत | |
| ६ | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नाव सभेत वाचून दाखवणे | अ.क्र.५ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे घोषित करणे | अ.क्र.६ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |
| ८ | आवश्यक ते नुसार उपाध्यक्ष पदाची निवडणूक घेणे व निकाल घोषीत करणे | अ.क्र.७ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |

ठिकाणः रायगड
दिनांकः ३१/०१/२०२२

सही/-
**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी, रायगड
अलिबाग

## म्हसळा नगरपंचायत, म्हसळा
### नमुना-'ब-' जोडपत्र
**रायगड जिल्ह्यातील म्हसळा, नगरपंचायत उपाध्यक्ष पदाचा निवडणूक कार्यक्रम व विशेष सभा कामकाज**

| | | अधिकारी यांचे नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र ज्या अधिकाऱ्याकडे दाखल करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे ठिकाण | श्री.मनोज उकिर्डे,मुख्याधिकारी म्हसळा नगरपंचायत | म्हसळा नगरपंचायत ता.म्हसळा, जि.रायगड |
| २ | नामनिर्देशन स्वीकारणेचा दिनांक/वेळ | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत | |
| ३ | पिठासिन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) दुपारी २.०० नंतर | |
| ४ | नामनिर्देशन पत्रे फेटाळण्यांत आलेली आहेत त्या उमेदवाराची नावे आणि नामनिर्देशन पत्रे फेटाळण्याची कारणे सूचना फलकावर प्रसिद्ध करणे | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | |
| ५ | पीठासीन अधिकाऱ्याचे निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्यांचा कालावधी | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सायंकाळी ५.०० पासून ते दिनांक ०८/०२/२०२२ रोजी (मंगळवार) सायंकाळी ५.०० वाजेपयर्यंत | |
| ६ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी सुचना फलकावर प्रसिद्ध करणे | दिनांक ०८/०२/२०२२ (मंगळवार) सायंकाळी ५.०० नंतर | |
| ७ | उमेदवारी मागे घेणे | दिनांक ०९/०२/२०२२ रोजी (बुधवार) सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | |
| ८ | उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे (वर्णानुक्रमे) | दिनांक ०९/०२/२०२२ (बुधवार) दुपारी ४.०० नंतर | |
| ९ | अध्यक्ष व पदासाठी निवडणूक विशेष सभा दिनांक वेळ | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) दुपारी १२.०० वाजता | |
| १० | निवडणूक लढविणाऱ्या व उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे विशेष सभेत वाचून दाखविणे | दिनांक १०/०२/२०२२(गुरूवार) दुपारी १२.०५ नंतर | |
| ११ | अध्यक्ष पदाची निवडणूक घेणे व निकाल घोषीत करणे | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) दुपारी १२.१० नंतर | |

ठिकाण : रायगड
दिनांक : ३१/०१/२०२२

सही/-
**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी, रायगड
अलिबाग

## निविदा सूचना

दिनांक :- ०१/०२/२०२२

ग्रामपंचायत मांडवणे, तालुका कर्जत, जि.रायगड येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत असलेल्या खालील कामाकरीता इच्छुक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | संख्या | अंदाज पत्रकीय रक्कम | एकूण किंमत | निविदा भरण्याची अंतिम तारीख/वेळ | निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मांडवणे येथे कंपोस्ट पिठ बनविणे | १ | ३३६५९/- | ३३६५९/- | दि.०८/०२/२०२२ रोजी सायं.५ वाजेपर्यंत | स्वच्छ भारत मिशन | |
| २ | मांडवणे येथे प्लास्टिक संकलन केंद्र बनविणे | ५ | ६२३३/- | ३११६५/- | दि.०८/०२/२०२२ रोजी सायं.५ वाजेपर्यंत | स्वच्छ भारत मिशन | |
| ३ | मांडवणे येथे लीज पिठ बनविणे | १४ | ३३६४४/- | ४७१०१८/- | दि.०८/०२/२०२२ रोजी सायं.५ वाजेपर्यंत | स्वच्छ भारत मिशन | |

**अटी व शर्ती**

१.कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत ग्रा.प.कार्यालयात पहावयास मिळतील.
२.साहित्याबाबत आवश्यक सविस्तर माहिती ग्रामपंचायतीकडून घेऊन दरपत्रक पाठविण्यात यावे.
३.प्राप्त निविदा व दरपत्रक दि.०९/०२/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.३० वा ग्रामपंचायत कार्यालयात मांडवणे येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
४.सदर कामाचे देयक अंदाज पत्रकीय रकमेच्या ७०% बिल हे स्वच्छ भारत मिशन योजनेचे अनुदान जमा झाल्यावर व ३०% बील १५ वा वित्त आयोग योजना सन २०२२-२३ आर्थिक वर्षाचे अनुदान जमा झाल्यावर अदा करणेत येईल, यांची नोंद घ्यावी.
५.नोंदणीकृत ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल.
६.प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणेच करांची रक्कम कपात केली जाईल.
७.सदरची कामे अंदाजपत्रकाप्रमाणे मा.ग.वि.अ.पं.स.कर्जत, पंचायत समिती कर्जत व उपअभियंता सो.बांधकाम यांजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली व देखरेखी खाली करावयाची असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवले आहे.
८.कोणतीही एक अथवा सर्व निविदा व दर पत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत मांडवणे यांस राहील.
९. सविस्तर अटी व शर्ती करीता ग्रामपंचायत कार्यालय मांडवणे यांसकडे संपर्क साधावा.

**श्री.अनिल घनश्याम पवार**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत मांडवणे**

**श्रीमती.पुष्पा पंढरीनाथ आगज**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मांडवणे**

## SECTION 1
## PRESS NOTICE
## NOTICE INVITING BIDS

The Superintending Engineer, PMGSY, Konkan Region, Thane on behalf of Government of Maharashtra invites theitem rate bids in electronic tendering system for Construction of Bridge under MukhyaMantri Gram Sadak Yojana in the district of RAIGAD, Tal-Shriwardhan for package number ADB-RAI-BR-01(span length 21.00 meter) including their maintenance for five years from the eligible contractors registered with Govt of maharashtra, in public Works Department / Rural Develpoment Department or Non-registered contractors.

Date of release of Invitation for Bide through e-procurement : 01st Feb 2022.

Availability of Bid Document and mode of submission:The bid document is available online and Should be submitted online in https://mahatenders.gov in The bidder would be required to register in the web site which is free of cost. For submission of the bids. the bidder is required to have a valid Digital Signature Certificate (DSC) from one of the authorized Certifying Authorities.

Last Date/ Time for recipt of bids through e-procurement: 10th Feb 2022 up to 17.00 hours.

For further details please log on to https://mahatenders.gov. in

Sd/-
**(J.R.Vibhute)**
**Superintending Engineer**
**Pradhan Mantri Gram SadakYojana**
**Konkan Region, Thane**

प्रो.जमा रू.५०/- अर्जदारातर्फे ॲड.अमेय उमेश म्हात्रे

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे.मुख्य न्यायदंडधिकारी सो.रायगड यांचे न्यायालयात**

क्रि.चौ.अर्ज नं.२२०/२०२१

श्रीमती स्मिता शंकर मोहिते — अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत नवेदर नवगाव — सामनेवाला
ता.अलिबाग, जि.रायगड

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार वरील ठिकाणी रहात असून अर्जदार यांचे वडील कै.शंकर कमळा मोहिते यांचे दिनांक १६/०९/२००२ रोजी मौजे नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. परंतु अर्जदार यांचेकडून वडिलांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, यांच्या कार्यालयीन दप्तरी २००२ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. परंतु आज रोजी अर्जदार यांस शासकीय/निमशासकीय कामाकरीता अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्युचा दाखल्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्याकामी अर्जदार याने मे.कोर्टात त्यांच्या वडिलांचा मृत्यूचा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.२/३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतःकिंवा वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर कोर्ट अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांस कायद्याने अर्जदार यांच्या वडिलांचा मृत्युनोंद दाखला देणेकामी संबंधीत ग्रामपंचायत/नगरपरिषद कार्यालयात आदेश दिला जाईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**स.अधिक्षक**
**मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट**
**अलिबाग-रायगड**

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**स.अधिक्षक**
**मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट**
**अलिबाग-रायगड**

## म ह त्त्वा चे

### माणगांव ग्रामीण पतसंस्थेचा वर्धापनदिन

**माणगांव :** सहकार क्षेत्रात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल ता. माणगांव या संस्थेच्या तेवीसावा वर्धापनदिन १ फेब्रुवारी २०२२ रोजी साजरा होणार आहे. या वर्धापन दिन संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड माणगांव या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

### मित्रमंडळींनी स्वच्छ केला वैकुंठघाट

**उरण :** आपला गाव म्हणजे एक दागिना आहे त्याला स्वच्छ ठेवणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. स्वच्छतेची सुरुवात स्वत:पासून केली तर बदल घडायला वेळ लागत नाही.स्वच्छ गाव सुंदर गावं, माझं गावं या संकल्पनेतून प्रेरणा घेत उरण तालुक्यातील पिरकोन गावातील फणसवाडी सेक्टर ११ येथील फणसवाडी मैत्री कट्टाच्या सर्व मित्र मंडळींच्या श्रमदानातून आणि स्वखर्चातून पिरकोन गावातील वैकुंठघाट स्मशान घाट या घाटावरच्या चिता पेटवायच्या पोलादी खांबांच्या खालच्या ढासळलेल्या अवस्थेतील पिलर्स आर.सी.सी.कॉंक्रीटचे बांधकाम करून त्याची डागडुजी करण्यात आली. सोबतच पिरकोन गावातील आजूबाजूचा संपूर्ण परिसर फणसवाडी सेक्टर ११ येथील फणसवाडी मैत्री कट्टाच्या माध्यमातून स्वच्छ करण्यात आला.

# ‘जेएसडब्ल्युच्या जहाजांमुळे खारलॅंडचे नुकसान’

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

धरमतर खाडीतील जेएसडब्ल्यू कंपनीच्या बेकायदेशीर ड्रेसिंगमुळे व जहाजांच्या वाहतुकीमुळे खारलॅंडचे, शेतीचे होणारे नुकसान व मच्छिमारांची होणारी हेळसांड याबाबत शेकापक्षाने आवाज उठवित प्रांत कार्यालयावर धडक दिली. यावेळी जेएसडब्ल्यू कंपनीने स्थानिक मच्छिमार बांधवाची नोकरभरती करावी व कंपनीमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी शेकाप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी केली.

जेएसडब्ल्यूच्या मालवाहू जहाजे ही धरमतर खाडीतून प्रवास करतात. परंतु या जहाजांमुळे धरमतर खाडीतील खारलॅंडचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्याचबरोबर कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरातील स्थानिक



माणकुळे-शिरवली रस्त्याचे काम रखडल्यासंदर्भात प्रांत अधिकाऱ्यांकडे शेकापचे आ. पंडित पाटील यांनी निवेदन मांडले आहे. माणकुळे-शिरवली या रस्त्यासाठी १० कोटी मंजूर करण्यात आले होते, परंतु ठेकेदारांच्या कामचुकारपणामुळे अद्याप १.५ कोटीची खर्च झाल्याचे समजले आहे. या रखडलेल्या रस्त्यांसाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा व योग्य ठेकेदारांकडे रस्त्याचे कामकाज सोपवावे असे निवेदन शेकापतर्फे प्रांत अधिकाऱ्यांना देण्यात आले.

### धरमतर खाडीमुळे जेएसडब्ल्यु आहे : माजी आ.पंडित पाटील

*खरंतर धरमतर खाडी आहे म्हणून आज जेएसडब्ल्यू कंपनी उभी आहे असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या खाडीमूळे हजारो मच्छिमारांचा संसार उभा आहे व त्यांचा उदरनिर्वाह या खाडीवर अवलंबून आहे. कंपनीमूळे या परिसरात दुर्गंधी तसेच परिसरातील वातावरण दुषित झाले असून कंपनीतील सांडपाण्यामूळे खाडीतील मासळीवर परिणाम होत आहे. केमिकलमूळे मासे मरत आहेत व याचा परिणाम स्थानिक मच्छिमारांच्या धंद्यांवर होत आहे. या सर्वाचा परिणाम दैनंदिन जीवनावर होत आहे व कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरात साथीच्या आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. कंपनीने स्थानिक बांधवांची नोकरभरती करावी व कंपनीमुळे होणारी नुकसानभरपाई द्यावी. या खाडीवर अनेक कुटूंब निर्भर आहेत. व या खाडीमुळेच जेएसडब्ल्यू कंपनी आहे असे माजी आ. पंडित पाटील बैठकीत म्हणाले.*

**|| माजी आ. पंडित पाटील आक्रमक**

**|| खारलॅंड खात्याकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याची बतावणी**

**|| नुकसान भरपाई व नोकऱ्या देण्याची शेकापची मागणी**

मच्छिमाराने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

कंपनीच्या केमिकलयुक्त सांडपाणी व कंपनीच्या प्लॅंटमधील गरम पाणी हे धरमतर खाडीत सोडले जाते. यामुळे खाडीतील जलचरांवर याचा परिणाम होतो. या सर्व गोष्टींचा परिणाम मच्छिमारांवर होतो. मच्छिमारांचे व्यवसायावर याचा मोठा परिणाम झाला आहे. कंपनीतून बाहेर सोडण्यात येणाऱ्या प्रदुषित वायुमुळे आजुबाजूच्या परिसरात आजारांचे प्रमाण वाढले आहे. कंपनीत सकाळच्या वेळेत होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे नागरिकांबरोबर पशुपक्ष्यांना त्रास होत आहे. यावर तोडगा काढा अशी शेकापक्षाने मागणी केली आहे. या बैठकीत जेएसडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पाहणी होईल व कंपनीतर्फे तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे.

खारलॅंड हा जिल्ह्याचा महत्त्वाचा भाग आहे. माणकुळे-बहिरीचापाडा या खारलॅंड विभागाच्या कामासाठी शासनाची अधिकृत मान्यता देऊनही खारलॅंड अधिकारी या कामास टाळाटाळ करत आहेत. खारलॅंड

> **खारलॅंड खात्याकडे पूरेसे अधिकारी उपलब्ध नाही म्हणून मला कामकाज करणे शक्य नाही असे कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. शेवटी प्रांत अधिकाऱ्यांनी सांगितले की, खारलॅंडची खांड भरणे गरजेचे आहे व रोजगार हमीतून तशी सोय उपलब्ध आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे भविष्यातील होणारे नुकसान यामुळे टाळता येईल.**
> **- पंडित पाटील शेकाप नेते**

अधिकाऱ्यांकडे स्टाफ नाही असे आजच्या बैठकीत वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकारी खारलॅंडच्या निधीसाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप शेकापचे माजी आ. पंडित पाटील यांनी बैठकीत केला.



## नागाव बंदर रस्त्याच्या कामाला सुरुवात

### ॲड. आस्वाद पाटील यांनी केला शुभारंभ

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत नागांव हद्दीतील नागांव बंदर रस्त्याच्या कामाला ३१ जानेवारी रोजी नागांव समुद्र किनाऱ्यावर जिल्हा परिषदेचे गटनेते ॲड. आस्वाद पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच निखिल मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, पंचायत समिती सभापती प्रमोद ठाकूर, सुरेंद्र नागलेकर, श्रीकांत आठवले, परेश ठाकूर, हर्षदा मयेकर, मानसी ठाकूर, ग्रामस्थ उपस्थित होते. गेली अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरावस्था झाली होती. सदर रस्त्यासाठी निधी मंजुर करुन काम सुरु करण्याची मागणी सरपंच निखिल मयेकर यांनी केली होती. तातडीने सदर काम सुरु न केल्यास उपोषण करण्याचा इशारा निखिल मयेकर यांनी दिला होता. जिल्हा परिषदेचे गटनेते ॲड. आस्वाद पाटील यांनी याकामात पुढाकार घेत शेकापक्षाच्या माध्यमातून सदर कामाला निधी उपलब्ध करुन दिला.

## कष्टकऱ्यांचा देव आज आपल्यातून निघून गेलेला आहे- धैर्यशील पाटील

**। पेण । वार्ताहर ।**

महात्मा गांधीवाचनालय पेण येथे स्वर्गीय प्रा. एन. डी. पाटील यांना आदरांजली वाहण्याकरता व कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता प्रा. एन डी. पाटील यांच्या अनुयायानी व शेतकरी कामगार पक्ष्याच्या कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थितीत होते. यावेळी आमदार धैर्यशील पाटील यांनी व्हिडीओ कॉलने जमलेल्या सर्व एन. डी. पाटील यांच्या अनुयायांशी संवाद साधला.

एका कृतार्थ जीवनाचा शेवट झालेला आहे. एक प्राध्यापक, एक उत्कृष्ठ वक्त, विचारवंत ज्ञानवंत एक प्रबोधनकार एक समाजसुधारक एक समाजकारणी एक तत्वनिष्ठ राजकारणी आपल्यातून निघून गेलेले आहेत. संघर्षशील कार्यकर्ता आणि अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभा राहणार खंबीर नेता आणि कष्टकऱ्यांची गोरगरीबांची शासन दरबारी वकील करुन त्यांना न्याय देणारा आज आपल्यातून निघून गेलेले आहेत. खर तर दोन दिवसापूर्वी आजचा कार्यक्रम ठरल्यानंतर मला कोरोना झाल्याने कार्यक्रमाला येता येत नाही. परंतु ज्या नेत्याने पेणच्या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवल्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या कार्यकर्ते पणाला आकार दिला. शेकापक्षाचे नेते एन. डी. पाटील नाव तर मी लहानपणापासून ऐकत तर होतो. पण प्रत्यक्ष पहायला, ऐकायला आणि अनुभवाला मिळाले ते २००६, २००७ च्या सेझच्या विरोधी लढयात. यशस्वी आंदोलन करणे हा तर त्यांचा जणू हक्कच होता. आंदोलनाच्यानिमीत्ताने ३५ ते ४० आंदोलने झाली. परंतु एकही गुन्हा न होता ऐवढा मोठा जनसमुदाय हाताळणे हा त्यांच्या ताकदीचाच तो विषय होता. प्रचंड प्रामाणामध्ये जनक्षोक तयार होणे आणि जनक्षोक तो विधायक स्वरुपात त्यांचे रुपांतर करुन शासनाला लोकहितवादी धोरण घेण्यास भाग पाडण यामध्ये त्यांचा हात दुसरा कोणी धरु शकत नव्हता. गेल्या पंचवीस, तीस वर्षात त्यांच्यापेक्षा दुसरा कोणीही नेता या दिसत नाही. शेतकऱ्यांची जमीन अंबानी घेऊ पहात होता. शेतकरी हे भांबावले होते, धास्तावले होते, घाबरलेले होते. भर उन्हात एन. डी. पाटीलांनी समोर बसलेल्या शेतकऱ्यांना अंबानीच्या बंगल्याची किंमत आपण चुकती करुन आपण बंगला आपल्या शेतकऱ्याच्या नावावर घेऊ शकतो. बघा अंबानी बंगला विकतो काय? अशा स्वरुपात ते जेव्हा बोलत तेव्हा शेतकऱ्यांची भीती कुठल्या कुठे पळत असे. आंदोलनकर्ता शेतकरी मनापासून खंबीर होत असे. एन. डी. पाटील यांनी खूप जणांना आधार दिला. यावेळी काशीनाथ पाटील, दिलीप पाटील, सुरेखा दळवी, गुरुनाथ मांजरेकर, परशुराम म्हात्रे, सपना पाटील, क्रांती पाटील, मोहिनी गोरे, एम. जे. ठाकुर, सी जी. पाटील, तुलसीदास म्हात्रे, संदीप गायकवाड आर्दीनी आपल्या विचाराच्या माध्यमातुन प्रा. एन. डी. पाटील यांना श्रध्दाजंली वाहिली.

भारतीय वृत्तपत्र दिनानिमित्त

## वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

भारतीय वृत्तपत्र दिन हा पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांना महत्त्वाचा दिवस म्हणून मानला जातो. महाराष्ट्र बंद असो की, कोरोनासारख्या महामारीत देशभरात घडणाऱ्या घटनांचा वृत्तपत्र विक्री करुन वाचकांपर्यत पोहोचविण्याचे कार्य करणाऱ्या स्टॉल धारकांचा खालापूर प्रेस क्लबने अनोखा उपक्रम घेत त्याच्या स्टॉलवर जाऊन सन्मान केला.

व्यवसायाच्या माध्यमातून देशात जनमानसात पेपरच्या माध्यमातून घडामोडी पोहोचविण्याचे काम असेच अवितर चालू ठेवा अशा शुभेच्छा दिल्याने या अनोख्या उपक्रमांनी भारावून गेले. खोपोली शहरात हजारो वाचक नियमित पहाटे पासून वृत्तपत्र विक्री करीत अनेकांच्या घरटी पेपर टाकण्याचे काम करीत असल्याने प्रत्येक ठिकाणच्या घटना वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचकांपर्यत पोहचविण्याचे काम खोपोली शहरात दिलीप पवार, ध्रुव मेहेंदळे, एकनाथ तोंडे, शिळफाटा येथे बाबू व मिलिंद वारंगे तसेच खालापूर शहरात हेमाताई चिंबुलकर हे वृत्तपत्र विक्रेते अविरतपणे पहाटे पासून वृत्तपत्राची विक्री करून देशभरात घडणाऱ्या घटना जनमानसात व वाचकांपर्यत पोहोचविण्याचे काम करीत असल्याने खालापूर प्रेस क्लबच्या माध्यमातून या पाच विक्रेत्यांचा सन्मान केला.

## परळी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी परीक्षा फी वाटप

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

को.ए. सो.डॉ. प्रभाकर रामचंद्र गावंड विद्यालय परळी येथे सुधागड रहिवासी संघ, ठाणे यांजकडून पितृछत्र हरपलेले विद्यार्थी, अपंग विद्यार्थी तसेच स्कॉलरशिप एस.टी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा फी वाटप कार्यक्रम ३१ जानेवारी रोजी झाला. अशा पद्धतीचा उपयुक्त उपक्रम राबविल्याने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची नवी उमेद निर्माण झाली आहे, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कोणत्याही अडचणी उद्‌भवू नयेत यासाठी परळी विद्यालयाच्या माध्यमातून विविध सामाजिक व सेवाभावी संस्थांच्या मदतीने सातत्याने प्रयत्न



व मदत केले जातात. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या सोयीसुविधा व सवलतींचा पुरेपूर वापर करून मन लावून सातत्यपूर्ण व एकाग्रता राखून अभ्यास करावा, व शैक्षणिक प्रगती साधावी असे आवाहन ॲड. प्रवीण कुंभार यांनी आवाहन केले. यावेळी विद्यार्थी तसेच विठ्ठल घाडगे अध्यक्ष, सुधागड रहिवासी संघ, ठाणे व निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## वृक्षारोपण करून आठवण जोपासणार

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा परिसरातील प्रेस फोटोग्राफर असणारे चंद्रकांत हसू मुंढे यांच्या वडिलांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर चंद्रकांत मुंढे यांनी समाजसेवक, पत्रकारमित्र यांच्याहस्ते वृक्षारोपण करून आठवण जोपासली आहे. वारकरी सांप्रदायाचा काळात त्यांनी पंढरपूर, आळंदी पायी चालत वाऱ्या केल्या आहेत. त्यांना आवड असल्याने पर्यावरण वाचविण्यासाठी ते नेहमीच वृक्षलागवड करायचे.वृध्दापकाळाने त्यांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांनी रविवारी राख धुण्याचा कार्यक्रमानंतर प्रेस फोटोग्राफर चंद्रकांत मुंढे यांनी आपले सहकारी पत्रकार मित्र, समाजसेवक यांच्या हस्ते घरासमोरील जागेत चंदन, बेल आदी वृक्षांची लागवड केली.

## रेवदंडयात आरओ वॉटर फिल्टर प्लॉन्टचा शुभारंभ



**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या तर्फे आर.ओ.वॉटर प्लॅंटचा शुभारंभ कार्यक्रम घेण्यात आला. या आर.ओ. वॉटर फिल्टर प्लॅंटचा शुभारंभ कार्यक्रमांस शेकापक्षाचे पक्ष प्रतोद ॲड. आस्वाद पाटील, व पंचायत समिती सभापती प्रमोद ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीसह रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच मनिषा चुनेकर, उपसरपंच मंदाताई बळी, ग्रा.पं.सदस्य खलिल तांडेल, राजन वाडकर, संतोष मोरे, शिल्पा मंगेश ठाकूर, शरद पाडुरंग गोंधळी, ममताबेन दिलिप पटेल, नेत्रा सुरेश पोसणे, दिक्षा अमित बळी, प्रिया मनोहर सांरग, गिता गणेश भांजीनाखवा, शुभांगी रघूनाथ कोंडे, आशा नारायण कमळनाखवा, नंदकुमार हले, चेरकर, वाघमारे, संदिप खोत सह शेकापक्ष जेष्ठ कार्यकर्ते हेमंत गणपत, सुरेश खोत, शरद वरसोलकर, सलिम तांडेल, प्रमोद नवखारकर, मिलिंद चुनेकर, राजू चुनेकर, उदय चुनेकर, देवकर, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सचिन मयेकर, व रेवदंडा ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

## सुधागड बौद्धजन पंचायत कमिटी अध्यक्षपदी भगवान शिंदे

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत रजिस्टर नंबर २७५६ ची बैठक रविवारी (ता.३०) रोजी पालीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात झाली. यावेळी मध्यवर्ती कमिटी तालुका अध्यक्षपदी भगवान शिंदे यांची तर तालुका सचिवपदी राजेश गायकवाड आणि सुप्रीम कमिटी अध्यक्षपदी नितीन गायकवाड यांची जनतेतून थेट बिनविरोध निवड करण्यात आली.

मध्यवर्ती कमिटी उपाध्यक्षपदी दिलीप जाधव, सहसचिवपदी नितीन जाधव, खजिनदार पदी अमित गायकवाड, सदस्य पदी सुनील गायकवाड व दिलीप मोरे यांची सर्वानुमते नेमणूक करण्यात आली.



यावेळी पी.बी.गायकवाड, छनक शिर्के, शशिकांत शिंदे, रवींद्रनाथ ओव्हाळ, राहुल सोनावले, दिलीप जाधव, अशोक कांबळे, जयवंत कांबळे, सुरेश जाधव, दिपक पवार, मंगेश गायकवाड, नरेश शिंदे, सिद्धार्थ गायकवाड, गौतम गायकवाड, चिंतामण पवार, सुनील गायकवाड, के.टी. गायकवाड, एम.वाय. गायकवाड, राजेश गणपत गायकवाड, मोरेश्वर कांबळे, राजेश नाना गायकवाड, दिपक गायकवाड, राहुल गायकवाड, निशांत पवार, अमित गायकवाड, चंद्रकांत साळुंखे, एल.डी. शिंदे, राहुल पवार, विजय कदम, राहुल कांबळे, आदेश कांबळे, विजय मोहिते, विलास जाधव, हेमंत गायकवाड, राहुल महाडिक, सुशील गायकवाड, सिद्धांत गायकवाड, विवेक रोकडे, रवींद्र महाडिक, भावेश गायकवाड व अक्षय गायकवाड आदी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## तरुणाचा मृत्यू

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. येथील कष्टकरी, श्रमजीवी, मजूर, मत्स्यव्यावसायिक व हातावर पोट असलेला श्रमिक वर्ग पोटापाण्यासाठी अविरत कष्ट उपसत असतो. असेच उदरनिर्वाहासाठी मासेमारीकरीता गेलेल्या शिळोशी गावचे पुलाजवळ अंबाजोड नदीच्या पाण्यात मासेमारीसाठी गेलेल्या एका व्यक्तीचा ३० जानेवारी रोजी पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पांडुरंग दळवी (२५) रा. टेम्भी वसाहत सुधागड, असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.






संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

### आजचे अन्नदाते



सौ. सीमा सुधीर पाटील, वाढदिवसानिमित्त अलिबाग



मरहुम इरशाद kutubuddin कप्तान, स्मरणार्थ अलिबाग

सौ. तन्वीका हर्षल वीरा, लग्न दिना निमित्त, पाचगणी



कु. आर्या संजीव शेट कर, वाढदिवसानिमित्त अलिबाग


## मुरुडमध्ये जंजिरा मुक्ती संग्राम दिन साजरा

### अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजवंदन संपन्न



***। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।***

*मुरुड शहरातील आझाद चौकात ३१ जानेवारी जंजिरा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुरुड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पंकज भुसे, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुरुड श्रीवर्धन व म्हसळा या तीन तालुक्यावर नवाब सरकारी राजवट होती. मुरुड येथील राजवाड्यावरून ते या तीन तालुक्याचा कारभार चालवत असत. भारताला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ ला मिळाले असले, तरी जंजिरा संस्थान नवाबाच्या ताब्यात असल्याने भारतात विलीन होण्यासाठी प्रत्यक्षात ३१ जानेवारी १९४८ रोजी सामील नाम्यावर सही झाल्यावर हे संस्थान भारतात समाविष्ठ झाले होते. सदरचा लोकमहोत्सव शासनाकडून साजरा होण्यासाठी रायगड प्रेस क्लब व मुरुड तालुका पत्रकार संघाच्या वतीने ३१ जानेवारी रोजी जंजिरा मुक्ती दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी आझाद चौकात ध्वजारोहण संपन्न झाल्यावर जंजिरा संस्थांचा इतिहास सांगणारा कार्यक्रम संपन्न होत असतो परंतु कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर सदरचा कार्यक्रम रद्द करण्यात येऊन फक्त ध्वजारोहण करण्यात आले. सदरील ध्वजारोहणासाठी नितीन गवारे,नायब तहसीलदार- गोविंद कोटंबे, पांडुरंग आरेकर,युगा ठाकुर, वासंती उमरोटकर, श्रीकांत सुर्वे, डॉ. राज कल्याणी, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, मेघराज जाधव, नयन कर्णिक, शुभांगी करडे आदी मान्यवर उपस्थित होते.*

*रायगड प्रेस क्लब व मुरुड तालुका पत्रकार संघ यांचे संयुक्त विद्यमाने गेल्या १२ वर्षांपासुन जंजिरा संग्राम दिन साजरा करीत आहे. मुरूड, म्हसळा व श्रीवर्धन या तीन तालुक्यांत नवाबांचे जंजिरा संस्थान होते. गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी वटहूकूम जारी करुन संस्थानिकांना भारतात विलीनीकरणास भाग पाडले. यामध्ये मराठवाड्याच्या निजामांचा व जंजिरा संस्थानच्या नवाबांनी सामिलनाम्यावर स्वाक्षरी करण्यास विलंबाने संमती दिली. हैद्राबाद संस्थान १७ सप्टेंबर १९४८ रोजी तर जंजिरा संस्थान ३१ जानेवारी १९४८ रोजी भारतात विलीन करण्यात आले.जंजिरा संस्थानात रक्ताचा एक थेंब ही न सांडता संस्थान विलीन झाले. जंजिरा मुक्ती संग्राम दिन साजरा व्हावा अशी पत्रकार संघाची भूमिका आहे.*

## संपादकीय

# सकारात्मकतेकडे

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अभिभाषणाने सुरुवात झालेल्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणात सकारात्मक बदल देशाच्या आर्थिक आघाडीवर होताना दिसतात. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात भारतीय अर्थव्यवस्था येत्या आर्थिक वर्षांत म्हणजे २०२२-२३ मध्ये ८ ते ८.५ टक्के दराने वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या शुक्रवारीच पदभार स्वीकारणारे देशाचे नवे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंथा नागेश्वरन यांचे हे पहिले आर्थिक सर्वेक्षण आहे. २०२०-२१ या वर्षामध्ये संपूर्ण लॉकडाऊन असलेल्या काळात अर्थव्यवस्था अत्यंत संकुचित झाल्याचा अनुभव आला होता. त्या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या पहिल्या तिमाहीत त्याचा आर्थिक परिणाम अपेक्षेपेक्षा खूपच कमी होता असे जवळपास सर्वच निकषांनुसार दिसून येते. ही सकारात्मक बाब आहे. तसेच, अन्य काही घटकांचा दबाव अर्थव्यवस्थेवर राहिला तरी करसंकलन उत्साहवर्धक असल्याचे दिसून येते. सदर अहवाल तयार केला जात असताना ओमिक्रॉनच्या रुपात एक नवीन लाट जगभरात पसरलेली दिसत होती, त्याची सावली अहवालावर दिसून येत असून या संभाव्य लाटेचा परिणाम शोषण्यासाठी तरतुदी करण्यात आल्याने आता सौम्य बनलेल्या या लाटेमुळे त्याचा अधिक सकारात्मक परिणाम दिसू शकेल. आपल्याकडे लसीकरणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवल्याने अर्थव्यवस्थेला पुन्हा आर्थिक गती प्राप्त झाली असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले असून येत्या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्था आठ ते साडेआठ टक्क्यांनी वाढण्यासाठी आवश्यक असलेले वातावरण निर्माण खचितच झाले आहे असा दावा सर्वेक्षणात करण्यात आला आहे. वाचकांना आठवत असेलच की कोरोनामुळे सर्व उत्पादक आस्थापने आणि उद्योग बंद होते त्या काळात कृषी आणि संलग्न क्षेत्रांवर या महामारीचा सर्वात कमी परिणाम दिसून आला होता. गेल्या वर्षी ३.६ टक्क्यांनी हे क्षेत्र वाढले होते. चालू आर्थिक वर्षांत त्याची किंचित अधिक म्हणजे ३.९ टक्क्यांनी वाढ होईल, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. मात्र या सर्वेक्षणानुसार, सेवा क्षेत्राला कोरोना साथीचा सर्वात जास्त फटका बसला असून विशेषत: ज्यामध्ये माणसांच्या एकत्रित वावरण्याच्या तथा संपर्काचा संबंध आहे, त्या गटाला तर खूपच फटका सहन करावा लागला होता. परिणामी गेल्या वर्षी हे क्षेत्र ८.४ टक्क्यांनी आकुंचले होते. वर नमूद केलेल्या दुसऱ्या लाटेतील संभाव्य परिणामांपेक्षा कमी परिणाम झाल्याने चालू वर्षात मात्र हे क्षेत्र ८.२ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. ही देखील सकारात्मक बाब आहे. म्हणजे आर्थिक स्थिती बदलत्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी चांगल्या स्थितीत आलेली आहे. त्यासाठी मुख्यत्वे, शेतीबरोबरच औद्योगिक उत्पादनातील वाढ यामुळे देखील मदत झाली आहे. परिणामी चालू आर्थिक वर्षात अंदाजे ९.२ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या काळात महसूल प्राप्ती गेल्या दोन वर्षांतील कालावधीच्या तुलनेत खूप जास्त वेगाने वाढली आहे. ही सकारात्मक परिस्थिती जनतेसाठी अधिक सुसह्य आणि लाभदायक करण्याचे काम अर्थमंत्री मंगळवारी आपल्या अर्थसंकल्पात कसे करतात ते पाहायला हवे. कारण, एका बाजूला महागाई रोखण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे तर दुसरीकडे गुंतवणूक आणि निर्यातीला चालना देणारा अर्थसंकल्प सादर करण्याचा दबावही त्यांच्यावर आहे. कर संकलन अत्यंत उत्साही असले तरी निर्गुंतवणुकीचे उद्दिष्ट मागे पडले आहे. आताच विधानसभा निवडणुका होत असल्याने त्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जाणारच नाही असे नाही. तसे झाले तर अर्थसंकल्पात अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तसेच काही प्रमाणात जनतेलाही अनेक सवलती देणारा तसेच निर्गुंतवणुकीतून सरकारी तिजोरीत भर घालणारा अर्थसंकल्प सादर होऊ शकतो. मात्र कोरोनामुळे अनेक ठिकाणी पुरवठा साखळीतील अडथळ्यांनी महागाई जागतिक स्तरावर देखील वाढलेली आहे. त्याचा विचार करावा लागेल. तसेच, कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ९० अमेरिकन डॉलरच्या पुढे गेल्या असून त्या यावर्षी शंभरी गाठण्याची शक्यता आहे. त्यामुळे महागाई कमी करण्यावर खूप मर्यादा येतील. या समस्यांचा सामना अर्थसंकल्पात कसा केला जाईल आणि रखडलेली रोजगार निर्मिती कशी साध्य केली जाईल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. कोरोना काळात जनता जी भरडली गेली, त्यांना कोणकोणत्या पद्धतीने दिलासा मिळतो, तेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पंजाब विधानसभा निवडणुकांचे ऐतिहासिक महत्त्व



प्रा. अविनाश कोल्हे

अपेक्षेप्रमाणे आता देशांत होत असलेल्या विधानसभांच्या प्रचाराचा जोर वाढलेला आहे. त्यातही सर्व लक्ष उत्तर प्रदेशाकडे असले तरी याखेपेला होत असलेल्या पंजाब विधानसभा निवडणूका वेगळ्या कारणांसाठी महत्त्वाच्या ठरतात. याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. १९६६ साली स्थापन झालेल्या पंजाब राज्यात आजपर्यंत विधानसभेच्या तेरा निवडणूका झालेल्या आहेत. मात्र या खेपेला होत असलेल्या विधानसभा निवडणूकांएवढी चुरस आधी कधीही बघायला मिळाली नव्हती.

यातील पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या खेपेला प्रथमच दलित समाजातील एक व्यक्ती मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेली आहे. भारतीय संघराज्यातील घटक राज्यांत दलित समाजाची सर्वात जास्त लोकसंख्या असलेले राज्य म्हणजे पंजाब. तेथे सुमारे तीस टक्के दलित समाज आहे. तरीही एवढ्या वर्षांत या राज्यांत दलितांचे असे खास राजकारण आकाराला आले नव्हते. या खेपेला मात्र अभ्यासक या दृष्टीने पंजाब विधानसभा निवडणूकांकडे बघत आहेत. पंजाबातील एकूण ११७ जागांपैकी ३४ जागा दलित समाजासाठी आरक्षित असतात. एका अभ्यासानुसार सुमारे ५४ मतदारसंघ असे आहेत जिथे दलित मतदारांची संख्या तीस टक्क्यांपेक्षा जास्त आहे. यातील दुसरी लक्षणीय बाब म्हणजे पंजाब राज्यातील दलित समाज इतर राज्यांतील दलित समाजापेक्षा आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आहे. याचा अर्थ असा की इथे पांरपरिक दलित राजकारण उभे राहत नाही.

आता होत असलेल्या विधानसभा निवडणूकांत अनेक पक्ष/ आघाडया सामिल झालेल्या आहेत. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपाची युती कॅप्टन अमरिंगसिंह यांनी स्थापन केलेल्या पंजाब लोक कॉंग्रेस आणि अकाली दल (संयुक्त) यांच्याशी आहे. १९९० च्या दशकात जेव्हा भाजपाने राष्ट्रीय राजकारणात जोरदार मुसंडी मारायला सुरूवात केली. त्या रणनीतीचा महत्वाचा भाग म्हणजे जमेल तिथे प्रादेशिक पक्षांशी युती. परिणामी तेव्हा भाजपाने अनेक स्थानिक पक्षांशी युती केली. पंजाबात अकाली दल, महाराष्ट्रात शिवसेना, आसाममध्ये असम गणतंत्र परिषद, आंध्रात तेलुगु देसम, बिहारमध्ये जनता दल (युनायटेड) वगैरे भाजपाने केलेल्या आघाडया आठवतात. या यादीकडे काळजीपूर्वक बघितले तर दिसून येते की एक पंजाबचा अपवाद वगळता भाजपाला या सर्व आघाडयांचा राजकीय फायदा झालेला आहे. बिहारमध्ये तर आज भाजपा पहिला क्रमांकाचा पक्ष झालेला आहे आणि सत्तारूढ आघाडीतही आहे. महाराष्ट्रात आज भाजपा विधानसभेतील सर्वात मोठा आहे तर आसाम राज्यात भाजपा स्वबळावर सत्तेत आहे. मात्र भाजपाला असा चमत्कार पंजाबात करता आलेला नाही. यातून त्या राज्याचे वेगळेपण स्पष्ट होते.

पंजाब राज्यात भाजपा फारसा प्रभाव पाडू शकला नाही. याची अनेक कारणं आहेत. पंजाब प्रांतापुरता सीमित असलेल्या अकाली दलासाठी आगामी विधानसभा निवडणूक



अतिशय महत्वाची ठरेल. २०१७ सालच्या विधानसभा निवडणूकीत या पक्षाला अवघ्या पंधरा जागा जिंकता आल्या होत्या. आता या पक्षाला चमकदार कामगिरी करून दाखवावीच लागेल. म्हणूनच अकाली दलाने मायावतींच्या बसपाशी निवडणूकपूर्व युती जाहिर केली आहे. ही युती जुन २०२१ मध्ये जाहिर झाली. याचा अर्थ अकाली दल या विधानसभा निवडणूकांची किती आधीपासून तयारी करत होता! कृषी कायद्यांच्या मुद्दावरून रालोआतून बाहेर पडलेल्या शिरोमणी अकाली दलाने २५ वर्षांनी पुन्हा एकदा बसपाशी युती केली आहे. अशा युती आधी जाहिर झाल्या तरी प्रत्यक्ष वाटप जेव्हा जाहिर होते तेव्हा धुसफुस सुरू होते. हे टाळण्यासाठी अकाली दल बसपा यांनी मागच्या वर्षी जागावाटप जाहिर केले. त्यानुसार एकूण ११७ जागांपैकी अकाली दल ९० जागा तर बसपा २० जागा लढवणार आहे.

यापूर्वी १९९६ साली अकाली दल आणि बसपा यांनी युती करून पंजाबातील विधानसभा निवडणूका लढवल्या होत्या. तेव्हा आघाडीने तेरापैकी अकरा जागा जिंकल्या होत्या. ही युती वर्षभरातच म्हणजे १९९७ साली तुटली आणि अकाली दल भाजपा यांची युती झाली. या युतीत अकाली दल मोठा पक्ष असल्यामुळे भाजपाला कमी जागा मिळत होत्या. तेव्हा युतीच्या फॉर्म्युल्यानुसार भाजपाला २३ जागा मिळायच्या. आता युती तुटल्यामुळे भाजपाला मैदान मोकळं आहे.

यावेळी पंजाबात होत असलेल्या विधानसभा निवडणूकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी वर्गाच्या सुमारे बावीस संघटना एकत्र येऊन स्थापन केलेला 'संयुक्त समाज मोर्चा' हा राजकीय पक्ष. या पक्षाच्या माध्यमातून शेतकरी वर्ग या निवडणूका लढवणार आहे. मात्र या संदर्भात काही बाबी लक्षात घेतल्या पाहिजे. 'राजकीय पक्ष म्हणजे समाजासमोर असलेल्या विविध समस्यांवर भूमिका घेणारे संघटन', ही सर्वमान्य व्याख्या आहे. कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाचा जाहिरनामा बघितला तर त्यात स्त्रीया, दलित/ आदिवासी कल्याण, रोजगार निर्मिती वगैरे विविध समस्यांबद्दल पक्षाचे धोरण व्यक्त झालेले दिसते. 'शेतकरी वर्गाचे हित' या एकाच मुद्द्याभोवती उभे असलेला 'संयुक्त समाज मोर्चा' हा पक्ष इतर बाबींबद्दल काय भूमिका घेतो, याकडे लक्ष लागलेले आहे. असा प्रकार एकेकाळी शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने केला होता. जोशींनी १९७९ मध्ये शेतकरी संघटना स्थापन केली होती आणि १९९४ साली 'स्वतंत्र भारत पक्ष' स्थापन केला होता. या पक्षाने २००४ साली महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका लढवल्या होत्या आणि फक्त एक आमदार निवडून आला होता. नंतर तर या पक्षाला फारसे यश मिळाले नाही. आता पुन्हा एकदा 'शेतकऱ्यांचे हित' हा एकमेव मुद्दा घेऊन पंजाबात एक नवा राजकीय पक्ष मतदारांसमोर आलेला आहे. या पक्षाचे यशापयश लवकर समजेलच.

सत्तारुढ काँग्रेसमधील गटबाजीबद्दल काय बोलावे? हा पक्ष स्वतःचाच एवढा मोठा शत्रू आहे की त्याला बाहेरच्या शत्रूंची गरज लागत नाही. आधी कॅप्टन अमरिंदरसिंगसारख्या ज्येष्ठ नेत्याची गच्छंती. त्याची काही तरी किंमत काँग्रेसला या निवडणूकांत द्यावी लागेल. या खेपेस मात्र काँग्रेसने कधी नव्हे तो राजकीय शहाणपण दाखवून चन्नी यांना मुख्यमंत्रीपदी बसवले. नंतर मात्र त्यांच्या डोक्यावर नवज्योत सिद्धू हे गृहस्थ प्रदेशाध्यक्ष म्हणून बसवलेले आहेतच. या महाशयांना पंजाबचा मुख्यमंत्री व्हायचे कधीपासून डोहाळे लागलेले आहेत. चन्नी जर यशस्वी झाले तर नंतरसुद्धा तेच मुख्यमंत्री होतील याचा अंदाज आल्यामुळे सिद्धूंनी आता चन्नी यांच्या विरोधात कारवाया सुरू केल्या आहेत. इतर चार राज्यांप्रमाणे पंजाब राज्यातही २०१७ साली विधानसभा निवडणूका झाल्या होत्या. तेव्हा झालेल्या विधानसभा निवडणूकांत एकूण ११७ जागांपैकी काँग्रेसने ७७ जागा जिंकल्या होत्या. आज मात्र तिथं आम आदमी पार्टीने जबरदस्त आव्हान उभं केल्याचं वातावरण आहे तर भाजपा अकाली दल यांची अनेक वर्षांची युती अलिकडेच संपुष्टात आली. आता अकाली दलाने मायावतींच्या बसपाशी युती केली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी काँग्रेसला रामराम ठोकला आणि स्वतःचा प्रादेशिक पक्ष 'पंजाब लोक कॉंग्रेस' हा दोन नोव्हेंबर २०२१ रोजी स्थापन केला.

'आम आदमी पार्टी' त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीला अनुसरून पंजाब राज्यातील लोकांसमोर आश्वासनांची खैरात करत आहे.

या निवडणूकीत पंजाब राज्यांतील जातींचे राजकारणसुद्धा जोरात आहे. स्थापन झाल्यापासून या राज्यावर जार्टशिख या गटाचे वर्चस्व राहिलेले आहे. इ.स. २०११ सालच्या जनगणनेनुसार पंजाबची लोकसंख्या सुमारे दोन कोटी ऐंशी लाख एवढी आहे. यात दलित समाज जसा ३२ टक्के आहे तसेच ओबीसीसुद्धा तीस टक्के आहेत. उरलेल्या तेहतीस टक्क्यांपैकी जार्टशिख वीस टक्के आहेत. ही आकडेवारी लक्षात घेतली म्हणजे गेली अनेक वर्षे पंजाबच्या राजकारणावर या समाजाची पकड का राहिलेली आहे याचा अंदाज येतो. सर्वच नियमांना अपवाद असतात तसंच याही नियमाला आहे आणि तो म्हणजे ग्यानी झैलसिंग यांचा. आता काँग्रेसने चन्नी यांच्यासारख्या एका दलित नेत्याला पुढे आणल्यामुळे पंजाबच्या राजकारणात दूरगामी बदल होतील की काय, याची चर्चा सुरू आहे. ही आज पंजाब राज्यातील विधानसभा निवडणूकांची आहे. या विविध पर्यायांतून मतदार कोणत्या पक्षाला/ आघाडीला संधी देतात हे लवकर दिसेलच.

(९८९ २१० ३८८०)

# कर्तव्याभिमुख सर्तकता

समाजात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या देशात पोलीस यंत्रणेचा अवलंब करण्यात आलेला आहे. विविध संकटप्रसंगी पोलीस यंत्रणा ऋतुमान, स्थिती, स्थळ, काळ असे कोणतेच भान न राखता आपले कर्तव्य पार पाडत असते. कोरोना या वैश्विक महामारीच्या काळात याचा चांगलाच प्रत्यय आला. अर्थातच पोलिसांच्या कर्तव्याभिमुख सतर्कतेमुळे समाजातील, परिसरातील एखादी अमंगळ, अयोग्य घटना टळू शकते किंवा एखादा अपघात टाळला जावू शकतो याचा अजून एक प्रत्यय नुकताच मुरुड तालुक्यातील काशीद या पर्यटनस्थळी आला आहे. रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने प्रथितयश असून, जिल्ह्याला लाभलेल्या समुद्रकिनाऱ्यामुळे पर्यटकांच्या अधिक पसंतीचा आहे. मुरुड-काशीद समुद्रकिनारा तर जिल्ह्यातील प्रतिगोवा म्हणूनच ख्यातनाम आहे. राज्यातील विविध भागातून पर्यटक विकेंड हॉलीडे एन्जॉय करण्यासाठी येत असतात. याप्रसंगी एखादी दुर्घटना घडू नये, म्हणून प्रशासन यंत्रणा सज्ज असते. पण पर्यटकांचा अतिउल्हास कधीकधी एखाद्या अयोग्य घटनेला आमंत्रण देत असतो. अशाच दोन घटना काशिद समुद्रकिनारा परिसरात घडल्या आहेत. यापैकी एका घटनेत पुणे लष्कर छावणी परिसरातून आलेल्या एका दाम्पत्यांचे जलक्रीडेच्या नादात त्यांच्या आठ वर्षाच्या मुलाकडे दुर्लक्ष झाले. परिणामी तो मुलगा आपल्या आईवडीलांना शोधताना या परिसरात फिरत फिरत मुख्य रस्त्यावर आला. अशा प्रसंगी एकतर तो बेपत्ता झाला असता किंवा भरधाव वाहनांमुळे त्याचा अपघात झाला असता. तर दुसऱ्या घटनेत मित्रांसोबत आलेला एक युवक समुद्रस्थानासाठी पाण्यात उतरला. पण त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडू लागला. मात्र या घटनांमध्ये अधोरेखित करण्याची बाब म्हणजे अशी की, कोणत्याही घटनेत पुढील अपघात घडला नाही. कारण 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीद घेत कर्तव्यावर सतर्क असणारे पोलीस हवालदार युवराज निकाले यांच्या सतर्कतेमुळे. पहिल्या घटनेत त्यांनी बेपत्ता पालकांचा शोध घेत त्यांच्या मुलाला स्वाधीन केले तर दुसऱ्या घटनेत ग्रामस्थांच्या मदतीने बुडणाऱ्या युवकाला जीवदान दिले. आणि हे शक्य झाले ते त्यांच्या कर्तव्याभिमुख सतर्कतेमुळे. याकामी त्यांना लाल सलाम..!

## वार-वार

प्रतिक कोळी

# बहुआयामी 'राजा' माणूस

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनाकाळात रचले गेलेले गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत आजही प्रत्येक मराठी मनात स्फुलिंग जागृत करते. अर्थात या गीताचे रचनाकार कविवर्य राजा बढे. सामान्यांना कवी म्हणून सुपरिचीत असणारे राजा बढे हे नावाप्रमाणे राजस व्यक्तीमत्वाचे धनी. अत्यंत साधे राहणीमान, चेहऱ्यावर मृदू मुलायम हास्य अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची काही वैशिष्ट्ये होती. प्रतिभासंपन्न कवी, लेखक, उत्कृष्ठ नाटककार, संगीतकार, अभिनेते, चित्रपट निर्माते, नखचित्रकार, खरडचित्रकार, चित्रकार आदी गुणांनी परिपूर्ण असणारे साहित्य तथा कला क्षेत्रातील बहुआयामी व्यक्तीत्व. त्याकाळी रेडीयोवर प्रसिद्ध ठरलेल्या 'श्रुतिका' आणि 'संगितीका' या प्रकाराचे जनक देखील राजा बढेच आहेत. महाराष्ट्र, वागिश्वरी, सकाळ आदी नियतकालिकांतून सहसंपादक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. याच काळात त्यांनी कोंडबा, दुर्गादास, लहर, तिरंदाजी, गुंड्याभाऊ यासारख्या टोपण नावांनी सामाजिक विषयांवर कोटी करणारे लेखनही केले. विडंबन या प्रकाराची त्यांनी लोकांना नव्याने ओळख करून दिली. कथाकथन या प्रकाराची मुळ संकल्पना राजाभाऊंचीच. कविवर्य राजा बढे यांच्या नावे एकंदर १८ काव्यसंग्रह, ४ नाटके, ९ संगितीका, ५ एकांकिका, १ कादंबरी, विविध प्रसिद्ध साहित्यांचं अनेक भाषांचं मराठी भावानुवाद, अनेक रसानुवाद आदी साहित्य आहे. सोबतच अनेक ऐतिहासिक प्रसंगांवरचं लेखन, लहान मुलांसाठीचं लेखन, एक लघु कादंबरी, याशिवाय विस्तृत स्पुटलेखन, लेख, टिपणं, आदी बरंच साहित्य प्रसिद्ध झालं. पण जितकं प्रसिद्ध झालं त्याच्या कितीतरी पटीनं साहित्य दुर्दैवानं अप्रकाशित राहिलं. इतकं भरभरून कार्य करणारा महाराष्ट्राचा उमदा कवी आजही उपेक्षितच आहे, ही अत्यंत खेदजनक गोष्ट म्हणावी लागेल. आपल्या कवितेचा धर्म ओळखून शेवटपर्यंत मनाला आल्हाद देणाऱ्या कविता लिहिण्याचे 'चांद्रव्रत' त्यांनी निष्ठेने पार पाडले, यातच त्यांची थोरवी आहे. हा कवी जन्मभर चांदणं शिंपीत जगला आणि चांदणं शिंपीत शिंपीत अचानक निघून गेला. आज त्यांची जयंती. अशा या बहुआयामी 'राजा' माणसाला दै. कृषीवलचा आदबीचा मुजरा..!




अशा रीतीने कर्तव्यभ्रष्ट होणे एखाद्याला आध्यात्मिक जीवनामध्ये प्रगती करण्यास सहाय्यक तर होतच नाही आणि या जगतामध्ये कीर्तिमान होण्याची संधीसुद्धा त्याला मिळत नाही. अर्जुनाची आपल्या नातलगांबद्दलची तथाकथित करुणा भगवान श्रीकृष्ण मान्य करीत नाहीत.

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप ।।३।।

क्लैब्यम्- नपुंसकत्व; मा स्म- नको; गमः- प्राप्त होऊ; पार्थ- हे पार्थ (पृथापुत्र); न- कधीही नाही; एतत्- या; त्वयि- तुझ्या ठिकाणी; उपपद्यते- शोभनीय, योग्य; क्षुद्रम्- क्षुद्र; हृदय- हृदयाचे; दौर्बल्यम्- दौर्बल्य, कमकुवतपणा; त्यक्त्वा- सोडून; उत्तिष्ठ- उठ; परन्तप- हे परंतप (शत्रूला त्रस्त करणारा)

हे पार्थ! अशा हीन नपुंसकतेची कास धरु नकोस. असे करणे तुला शोभत नाही. अंतःकरणाचे असे क्षुद्र दुबळेपण सोडून दे आणि हे परंतप! उठ.

तात्पर्य : अर्जुनाला या ठिकाणी पृथेचा पुक्ष म्हणून संबोधण्यात आले आहे. श्रीकृष्णांचे पिता वसुदेव यांची पृथा ही बहीण असल्यामुळे अर्जुनाचे व श्रीकृष्णांचे रक्ताचे नाते होते. जर एखाद्या क्षत्रियाचा पुत्र युद्ध करण्याचे नाकारत असेल तर तो केवळ नावापुरताच क्षत्रिय राहतो आणि जर एखादा ब्राह्मणपुत्र अपवित्र कार्य करीत असेल तर तो सुद्धा केवळ नावापुरताच ब्राह्मण राहतो. असे क्षत्रिय आणि ब्राह्मण म्हणजे त्यांच्या पित्याचे नालायक पुत्र होत. म्हणून अर्जुनाने याप्रमाणे नालायक क्षत्रियपुत्र होऊ नये, असे श्रीकृष्णांची इच्छा होती. अर्जुन हा श्रीकृष्णांचा अत्यंत जिवलग मित्र होता आणि श्रीकृष्ण रथावर प्रत्यक्षपणे त्याला मार्गदर्शन करीत होते; परंतु या सर्व गोष्टी अनुकूल असताना जर अर्जुनाने युद्धाचा त्याग केला तर ते त्याच्याकडून अपकीर्तीकारक कार्य घडले असते. म्हणून श्रीकृण म्हणतात की, अर्जुनाच्या ठिकाणी अशा प्रकारची प्रवृत्ती असणे हे त्याच्यासारख्या व्यक्तीला शोभण्यासारखे नाही. आपल्याला अत्यंत आदरणीय असणारे भीष्म आणि आपले नातलग यांच्याबद्दलच्या आपल्या उदार मनोवृत्तीच्या सबबीवर आपण युद्ध करण्याचे सोडून देतो असा युक्तिवाद अर्जुन कदाचित करील, पण श्रीकृष्णांच्या मताप्रमाणे अशा प्रकारचे औदार्य म्हणजे वास्तविकपणे मनोदौर्बल्यच आहे. अशा प्रकारच्या मिथ्या औदार्याला कोणत्याही अधिकारवंतांनी संमती दिलेली नाही. म्हणून श्रीकृष्णांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली अर्जुनासारख्या व्यक्तींनी अशा प्रकारचे औदार्य आणि तथाकथित अहिंसा यांचा त्याग केला पाहिजे.

अर्जुन उवाच
कथं भीष्ममहं सङ्ख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ।।४।।

अर्जुनः उवाच- अर्जुन म्हणाला; कथम्- कसे; भीष्यम्- भीष्म; अहम्- मी; सङ्ख्ये- युद्धामध्ये; द्रोणम्- द्रोण; च- सुद्धा; मधुसूदन- हे मधुसूदन; इषुभिः बाणाद्वारे; प्रतियोत्स्यामि- उलट प्रहार करु; पूजा-अर्हौ- जे पूजनीय आहेत त्यांना; अरि-सूदन- हे शत्रूसंहारक, अरिसूदन.

अर्जुन म्हणाला : हे अरिसूदन! हे मधूसूदना! मला पूजनीय असणाऱ्या भीष्म, द्रोणांसारख्या व्यक्तींवर मी बाणांनी प्रतिहल्ला कसा करु शकेन?

तात्पर्य : पितामह भीष्म आणि द्रोणाचार्य यांच्यासारख्या सन्माननीय व्यक्ती या सर्वदा पूजनीय आहेत आणि जरी त्यांनी हल्ला केला तरी त्यांच्यावर प्रतिहल्ला करणे अयोग्य आहे. असा एक सर्वसामान्य शिष्टाचार आहे की, ज्येष्ठ व्यक्तींशी शाब्दिक वादसुद्धा घालू नये. काही वेळा ते जरी कठोरपणे वागले तरी त्यांच्याशी कठोर वागू नये. असे असताना अर्जुनाने त्यांच्यावर प्रतिहल्ला करणे कसे काय शक्य आहे? आपले पितामह उग्रसेन आणि आपले गुरु सांदीपनी मुनी यांच्यावर श्रीकृष्ण कधी तरी आक्रमण करु शकतील काय?अर्जुनाने श्रीकृष्णांजवळ केलेले हे काही युक्तिवाद आहेत.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

श्याम ठाणेदार

# पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. १९ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता. त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या. त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सील्पेन्स तसेच



एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याएवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली, परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतराळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर कॉंग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# महाविकास आघाडीचा निर्णय स्थानिकांकडे

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

दापोली, मंडणगड नगरपंचायतीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा फॉर्म्युला यशस्वी झाला आहे. मात्र तो पुढे रत्नागिरीपर्यंत आणायचा की नाही हे स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी ठरवतील असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले आहे. यामुळे रत्नागिरीतील शिवसेनेतील इच्छुक निर्धास्त झाले आहेत.

रत्नागिरी नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत हे रत्नागिरी दौर्‍यावर असून, यासंदर्भात प्रसारमाध्यमांसोबत संवाद साधताना त्यांनी हे स्पष्ट केले आहे.

## उदय सामंत यांचे प्रतिपादन



उदय सामंत यांचे प्रतिपादन

नुकत्याच झालेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकीत दापोली, मंडणगडमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविल्या होत्या. दापोलीत महाविकास आघाडीला निर्विवाद वर्चस्व मिळाले. मंडणगडमध्ये शहर विकास आघाडीने बाजी मारत सतरापैकी ६ जागांवर वर्चस्व राखले. तर राष्ट्रवादीने ७ जागा मिळवल्या. शिवसेनेला एकही जागा मिळाली नसली तरीही त्याचा फायदा राष्ट्रवादीला झाला. चार जागा अपक्षांना मिळाल्या आहेत.

दापोलीमध्ये सतरापैकी चौदा जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आले. त्यात राष्ट्रवादीला एक जागा अधिक मिळाली. दापोलीचा पॅटर्न यशस्वी झाल्यामुळे आगामी नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी करणार का असा प्रश्न उपस्थित केला जात होता. महिन्याभरापुर्वी रत्नागिरीत झालेल्या शिवसेना पदाधिकार्‍यांच्या बैठकीतही महाविकास आघाडीचे संकेत दिले गेले होते. त्यामुळे रत्नागिरीतील इच्छुकांमध्ये चलबिचल सुरु झाली. रत्नागिरी नगरपालिकेत शिवसेनेची एकहाती सत्ता आहे.

राष्ट्रवादीचे चार नगरसेवक असून सहा जागा भाजपच्या आहेत. राष्ट्रवादीत कार्यरत असलेल्या चारपैकी तिघे शिवसेनावासी झाले आहेत. त्यामुळे सुदेश मयेकर हे एकमेव नगरसेवक उरले आहेत. राष्ट्रवादीकडूनही पन्नास टक्के जागांची मागणी केली जात आहे. शिवसेनेची एक हाती सत्ता असल्यामुळे इच्छुकांची भाऊगर्दी आहे. त्यामधून उमेदवार निवडीचे मोठे आव्हान शिवसेना नेतृत्वापुढे आहे.

या परिस्थितीत महाविकास आघाडी झाली तर अनेकांचे पत्ते कट होणार आहेत. त्यांना अन्य अपक्ष किंवा अन्य पर्याय अवलंबावा लागू शकतो. काहींनी चाचपणीही सुरु केली आहे.

### आरक्षणाची प्रतीक्षा

**पाच वर्षांची मुदत संपल्यामुळे सध्या पालिकेवर प्रशासक आहे. प्रभागनिहाय आरक्षणासंदर्भात निर्णय झालेला नाही. ओबीसी आरक्षणाबाबतही संभ्रम आहे. त्यामुळे इच्छुक कितीही असले तरीही सगळीकडेच संभ्रमाचे वातावरण आहे. आरक्षणाविषयीच्या निर्णयाची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.**

## आमदार नियुक्तीसाठी न्यायालयात जाणार

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

सव्वा वर्षापूर्वी कॅबिनेटच्या मंजुरीने विधान परिषदेवर १२ आमदारांची नियुक्ती व्हावी म्हणून राज्यपालांकडे प्रस्ताव दिला होता. याबाबत सुप्रीम कोर्ट काही निर्णय करू शकते का, याबाबत विधीतज्ज्ञांशी चर्चा करून त्याविषयी अपील करण्यावर विचार सुरू आहे. हा माझा वैयक्तिक प्रयत्न आहे. यात महाविकास आघाडी किंवा शिवसेनेचा काही संबंध नाही. लवकरच याबाबतच्या निर्णयापर्यंत येऊ, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री सामंत म्हणाले, की आमदार नियुक्ती प्रकरणाचा अभ्यास करून, विधी तज्ज्ञांशी चर्चा करून, सुप्रीम कोर्टात तसे पिटीशन दाखल करता येईल का, याचा विचार मी करीत आहे. ते कोणाच्या माध्यमातून दाखल करायचे, याचा कायदेशीर सल्ला घेऊनच पुढील पाऊल टाकेन.

आमदार म्हणून नियुक्त करण्याची शिफारस असलेल्या १२ लोकांनी विविध क्षेत्रांत भरीव कामगिरी केली आहे. हा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याबाबत न्यायालय काही करू शकले, तर जो अन्याय झाला आहे, तो दूर होईल, असा विचार आहे. या विषयाची कागदपत्रे, प्रस्ताव व अन्य माहिती प्राप्त करूनच पुढे जाणार असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

## महत्त्वाचे

### सीताराम मांडवकर यांचे निधन

**राजापूर :** शहरातील वरचीपेठ येथील रहिवासी व सेवानिवृत्त मुख्याध्यापक सीताराम गणू मांडवकर (८७) यांचे मुंबई येथे अल्पशा आजाराने निधन झाले. अणसुरे येथील श्री सिध्दीविनाय विद्यामंदिरचे मुख्याध्यापक संजय मांडवकर यांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात चार मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सीताबाई शिर्के यांचे निधन

**चिपळूण :** तालुक्यातील चिवेली-गांवदर वाडी येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष रामचंद्र शिर्के यांच्या .मातोश्री सीताबाई रामचंद्र शिर्के यांचे वृद्धापकाळाने दिनांक २९ जानेवारी रोजी आपल्या रहात्याघरी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय १०६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात सुपुत्र सुभाष व सून सीमा सुभाष शिर्के, चार कन्या नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी दिनांक ७ फेब्रुवारी व उत्तर कार्य दिनांक ९ फेब्रुवारी रोजी चिवेली गांवदर वाडी येथे होणार आहे.

### दुचाकीने घेतला पेट

**खडकवासला :** सिंहगड घाटात अचानक एका दुचाकीला आग लागली. चालक वेळेत बाजूला झाल्याने त्यामुळे जीवितहानी झाली नाही. परंतु त्यानंतर दुचाकीची आग रस्त्यालगतच्या गवताला आग लागली. गाडीची आग विझवणे, वाहतूक कोंडी, वणवा विझविण्यासाठी वन संरक्षण समितीची कर्मचारी यांनी धावपळ झाली. सुरक्षारक्षकांचे खबरदारीमुळे मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, घाटरस्त्यात मोठा गोंधळाचे वातावरण झाले होते.

## पान १ वरुन

### खारेपाटात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणार

हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी माजी मंत्री मीनाक्षी पाटील, माजी आमदार पंडित पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा गटनेते ॲड.आस्वाद पाटील, जिल्हा परिषद सदस्य भावना पाटील, पंचायत समितीचे सभापती प्रमोद ठाकूर, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, मारुती पाटील, नारंगीच्या सरपंच स्मिता पाटील, उपसरपंच अमोल पाटील, नारंगी आस विद्यालयाचे हितचिंतक अशोक हिरामत, चित्रलेखा हिरामत, विकास काकवानी, लिना काकवानी, पेझारीचे उपसरपंच ॲड.मनोज धुमाळ, गटविकास अधिकारी साळावकर, माजी सभापती कुंदा गावंड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नरहरी म्हात्रे, तसेच झी न्युजच्या निवेदिका रिद्धी प्रसाद म्हात्रे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

आ. जयंत पाटील आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, खारेपाटाचा एक वेगळा इतिहास आहे. सदैव स्फुर्ती देणारा असा हा खारेपाट आहे. आगरी समाज आहे, त्या ठिकाणी विकासाचे वेगळे चित्र दिसते. रायगडच्या आगरी समाजाची इंगजांमध्ये देखील दहशत होती. म्हणूनच इंग्रज रायगडकडे फिरकले देखील नाहीत. या समाजाकडे बुद्धीमत्ता आहे, आक्रमकता आहे. नारंगी ग्रामपंचायतीच्या टिमचे काम उत्कृष्ट चालले असून मला अभिप्रेत असणारे काम होत असल्याने समाधान वाटते. त्यामुळे मी नारंगीसाठी दुप्पट निधी देईन अशी ग्वाही त्यांनी दिली. खारेपाटातील नाट्य संस्कृती टिकवली पाहिजे. भजन स्पर्धांचे आयोजन करुन ग्रामीण भागातील नाट्य संस्कृती शहरात गेली पाहिजे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. गेल्या काही वर्षात शेकापक्षाने अलिबाग तालुक्यात प्रचंड काम केले आहे. त्यामुळे आता काम केले नाही तरी शेकापक्षाचाच आमदार येईल अशी परिस्थिती असल्याचेही ते म्हणाले. शेकाप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अलिबाग मतदारसंघात आपण प्रचंड निधी आणला. खारलँडसाठी ११ कोटींचा निधी मंजुर करुन आणला होता. मात्र ते काम थांबवण्यात आले आहे. माणकुले ते शिरवलीसाठी १० कोटीचा निधी मंजुर केल्याचेही ते म्हणाले. शेकापक्षाने रायगडच्या कानाकोपर्‍यात काम केले आहे. जयंत पाटील यांच्यासारखा आमदार आहे म्हणून रायगडचे प्रश्न सभागृहात मांडले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांनी आपल्या मनोगतात नागावमध्ये अत्याधुनिक असे क्रीडा संकुल उभारण्यात आले असून भविष्यात खारेपाटात देखील असे क्रीडा संकुल उभारण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी सांगितले. तीन चार गावे मिळून क्रीडा संकुल उभारून या भागातील खेळाडू देशपातळीवर कामगिरी गाजवतील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. चित्रलेखा हिरामत यांनी आपल्या मनोगतात शिक्षणामुळे काहिही करता येते हा आत्मविश्वास मिळतो. नारंगी हे गाव मॉडेल असून सर्वांचे सहकार्य मिळाल्यास भविष्यात आणखी सर्वतोपरी मदत आपल्या कुटूंबाकडून केली जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

प्रस्तावना माजी उपसभापती अनिल पाटील यांनी केले. निवेदन वेदांत कठंक यांनी केले. कार्यक्रमासाठी गाव अध्यक्ष प्रमोद पाटील, रांजणखार गाव अध्यक्ष संजय पाटील, नरेश म्हात्रे, सविता धुमाळ, शिल्पा म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, अनिल धुमाळ, राहूल पाटील, स्वप्निल म्हात्रे, माजी सरंपच विनोद पाटील, मंगेश म्हात्रे, वर्षा पाटील, अमृता म्हात्रे आदींनी परिश्रम घेतले.

### पुन्हा शाळेची घंटा वाजली

स्तरीय टास्क फोर्सच्या आढाव्यानंतर पनवेल तालुका वगळता उर्वरित तालुक्यातील शाळा ३१ जानेवारीपासून सुरु करण्यात येतील असे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी जाहीर केले होते. त्याप्रमाणे कोरोनाच्या नियमांचे पालन करून जिल्ह्यातील शाळा सुरू झाल्या आहेत. शाळा सुरू झाल्याने मुल, शिक्षक पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा प्रशासनाकडूनही कोरोना नियमांचे पालन करून मुलांना ऑफलाईन शिक्षण सुरू केले आहे.

कोरोनाच्या अनुषंगाने आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळेतील वर्ग सॅनिटायझर केले आहेत. शाळेत येणार्‍या विद्यार्थ्यांची तापमान तपासणी आणि सॅनिटायझर देऊन प्रवेश दिला जात आहे. शाळेत एका बेंचवर एक विद्यार्थी बसविण्यात आले आहेत. शाळेत एक दिवस आड विद्यार्थी येणार असून सुरक्षित अंतराच्या नियमांचे पालन शाळा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### २०१६ पासून देशात ६० हजार नवे स्टार्टअप

कोविंद यांनी सोमवारी संसदेत बोलताना म्हटले आहे. मी त्या लाखो स्वातंत्र्यसैनिकांना नमन करतो ज्यांनी त्यांच्या कर्तव्याला प्राधान्य दिले आणि भारताला हक्क मिळवून देण्यासाठी मदत केली. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात भारताच्या विकासाच्या वाटचालीत योगदान देणार्‍या व्यक्तिमत्त्वांचेही मी आदरपूर्वक स्मरण करतो, असे राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणाले. कोरोनाने अनेक लोकांना आपल्यापासून हिरावून घेतले. या काळात काम करणार्‍या सर्व फ्रंटलाईन वर्कर आणि नागरिकांचे राष्ट्रपतींनी आभार मानले. कोरोनाच्या काळात अनेक देशात अन्नधान्याची कमी पाहायला मिळाले. परंतु ८० करोड लाभार्थ्यांना फायदा मिळाला. तसेच डिजिटल इंडियातही सरकारने प्रभावी काम केले. कोरोनातही पेय जल ६ करोड लोकांना फायदा झाला तसेच स्वामित्व योजनेअंतर्गत लोकांना फायदा झाला. कोणीही उपाशीपोटी घरी परतणार नाही याची खात्री करण्यासाठी, माझे सरकार दर महिन्याला पंतप्रधान गरीब कल्याण योजनेचा भाग म्हणून गरिबांना मोफत रेशनचे वाटप करते. आज भारत जगातील सर्वात मोठा अन्न वितरण कार्यक्रम चालवत आहे; ती मार्च २०२२ पर्यंत वाढवण्यात आली आहे, असे राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणाले.

### आर्थिक विकास दर ८ टक्के

राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच पुढच्या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कमी होऊन तो ८ ते ८.५ टक्के इतका राहील असे म्हटले आहे. देशाचा आर्थिक पाहणी अहवालासंदर्भात सविस्तर माहिती प्रमुख आर्थिक सल्लागार व्ही.अनंत नागेश्वरन हे माध्यमांशी संवाद साधणार आहेत. सेवा क्षेत्रात वाढीचा दर हा ८.९ टक्के राहील अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## दापोलीतील १९ जणांची अनामत जप्त

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

दापोली नगरपंचायतीच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत १९ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. दापोली नगरपंचायतीच्या १७ जागांसाठी ६० उमेदवार रिंगणात होते. त्यातील १९ उमेदवारांना मिळालेली मते ही त्या प्रभागातील मतमोजणीत वैध ठरलेल्या मतांच्या एक अष्टमांशपेक्षा कमी असल्याने या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना भरलेली निवडणूक अनामत रक्कम जप्त झाली आहे.

या उमेदवारांमध्ये प्रभाग क्र. १ मधील मनसेचे उमेदवार प्रशांत जाधव, भाजपचे अजय शिंदे, प्रभाग क्र. २ मधील भाजपच्या उमेदवार साधना धाडवे, प्रभाग क्र. ३ मधील काँग्रेसचे उमेदवार अब्दुल बसित काझी, भाजपचे स्वरूप महाजन, प्रभाग क्र. ४ येथील भाजपचे नवाझ तळघरकर, काँग्रेसचे जहीर तळघरकर, प्रभाग क्र. ६ येथील भाजपच्या वेदा गोरे, प्रभाग क्र. ७ येथील मनसेच्या किरण गायकवाड, प्रभाग क्र. ८ येथील मनसेचे अरविंद पुसाळकर, अपक्ष दिलीप भैरमकर, भाजपचे ऋषिकेश हेदुकर, प्रभाग क्र. ९ येथील अपक्ष उमेदवार किरण घोरपडे, भाजपचे जितेंद्र महाडिक, प्रभाग क्र. १२ येथील बसपाच्या उमेदवार विशाखा पवार, भाजपाच्या उमेदवार मृणाली सोंडकर, प्रभाग क्र. १३ येथील भाजपच्या उमेदवार सान्वी कदम, प्रभाग क्र. १४ येथील भाजपचे उमेदवार अतुल गोंदकर, काँग्रेसच्या वृषाली कदम यांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

## विद्यार्थिनीने बनवले आत्महत्या रोखणारे उपकरण

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

देवरुख तालुक्यातील कोंड्ये येथील निर्मला भिडे जनता विद्यालय व इंद्रनील तावडे कनिष्ठ महाविद्यालय येथे नववीत शिकणार्‍या रिया दीपक लाड या विद्यार्थिनीने तयार केलेल्या 'एस.पी.हूक' (सुसाईड प्रिव्हेंटींग हूक) या आत्महत्या रोखणार्‍या उपकरणाची राज्यस्तरीय इन्स्पायर मानक ॲवॉर्ड प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या प्रदर्शनासाठी जिल्ह्यातून ७५० नामांकने नोंदविण्यात आली. त्यातून ७७ जणांची निवड झाली. त्यात दिव्याचा समावेश आहे. यासाठी तिला विज्ञान शिक्षक ज्ञानेश्वर शिंदे, मुख्याध्यापक अरुण कुराडे व सहकारी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. इमारतीचे बांधकाम करताना एखाद्या खोलीमध्ये पंखा अडकविण्यासाठी छताला सुरूवातीला हूक तयार करून ठेवला जातो. या हूकाला एस.पी.हूक अडकवून त्या हूकाला पंखा अडकवायचा. छताच्या मूळ हुकाला एस.पी. हूक अडकविलेला फारसा निदर्शनास येत नाही.

पंख्याला सुमारे दहा किलोपेक्षा जास्त वजन लटकत त्यावेळी खर्‍या अर्थाने एस.पी. हूकाचे काम सुरू होते. त्यामध्ये दहा किलोपेक्षा जास्त वजन लटकते. त्यावेळी एस.पी.हूक ॲटोमेटीक पंखा सोडून देते.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव**
**ई-निविदा सुचना क्र.०३ सन. २०२१-२०२२**

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत खालील पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगांव यांचेकडून मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | अंदाजित किंमत (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | शहापाडा ३८ गांवे (वितरण व्यवस्था) प्रादेशिक पा.पू.योजना ता.पेण जि.रायगड | २३११.४५ |
| २ | लोधीवली पाणी पुरवठा योजना ता.खालापूर जि.रायगड | ९३१.२० |

सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.
दिनांक : २५/०१/२०२२
सही/-
**(व्ही.के.सुर्यवंशी)**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगांव

**माणगाव नगरपंचायत, माणगांव**
**नमुना-'ब-१' जोडपत्र**
**रायगड जिल्ह्यातील माणगाव, नगरपंचायतीचे उपाध्यक्ष पदाचा निवडणूक कार्यक्रम व विशेष सभा कामकाज**

| | | अधिकारी यांचे नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र ज्या अधिकाऱ्याकडे दाखल करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे ठिकाण | श्री.राहुल इंगळे,मुख्याधिकारी माणगाव नगरपंचायत | माणगांव नगरपंचायत ता.माणगांव, जि.रायगड |
| २ | नामनिर्देशन स्वीकारणे दिनांक/वेळ | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंत | |
| ३ | पिठासिन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) (अध्यक्ष पदाची निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर) | |
| ४ | वैधपणे नामनिर्देशन झालेल्या उमेदवारांची नावे वाचून दाखवणे | नामनिर्देशन पत्राची छानन झाल्यानंतर | |
| ५ | उमेदवारी मागे घेणे | अ.क्र.४ प्रमाणे नावे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत | |
| ६ | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नाव सभेत वाचून दाखवणे | अ.क्र.५ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे घोषित करणे | अ.क्र.६ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |
| ८ | आवश्यक ते नुसार उपाध्यक्ष पदाची निवडणूक घेणे व निकाल घोषीत करणे | अ.क्र.७ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर | |

ठिकाणः रायगड
दिनांकः ३१/०१/२०२२
सही/-
**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी, रायगड
अलिबाग

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) नंदकिशोर रसिकलाल अग्रवाल, २) निश्चल नंदकिशोर अग्रवाल, ३) निशांत नंदकिशोर अग्रवाल, यांना मौजे-मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ७१ | ४/अ | २-६७-०० | ०रू-८१ पैसे, |

वरील शेतजमिन मिळकतीचे विद्यमान मालक मे.अशु फार्मस प्रा.लि. रा.मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून रजिस्टर्ड दस्तऐवजाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीच्या विद्यमान मालक व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. वर वर्णन केलेल्या मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तर वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्नवस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क तसेच अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दि.०१/०२/२०२२
**ॲड.वसंत गोविंद रवणे.**
रा.माऊली को.हा.सो.,फ्लॅट नं.१०४,पहिला मजला.'ए' विंग, विठ्ठल नगर कर्जत, जि.रायगड.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि. नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| आगरसुरे | २११/२ | ०-११-९० ०-०७-२० ०-१९-१० पो.ख.०-००-९० ०-२०-०० | १.७६ | प्रतिक विजय गुप्ता, सुमन विजय गुप्ता. |
| आगरसुरे | २१२/३ | ०-१४-५० ०-१६-६० ०-३१-१० पो.ख.०-०२-५० ०-३३-६० | २.०६ | प्रतिक विजय गुप्ता सुमन विजय गुप्ता. |
| आगरसुरे | २१२/४ | ०-१९-२० ०-२१-१० ०-४०-३० पो.ख.०-०३-२० ०-४३-५० | २.६८ | सुमन विजय गुप्ता |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १/२/२०२२
सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राहमणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

**माणगाव नगरपंचायत, माणगांव**
**नमुना-'ब-' जोडपत्र**
**रायगड जिल्ह्यातील माणगाव, नगरपंचायतीचे अध्यक्ष पदाचा निवडणूक कार्यक्रम व विशेष सभा कामकाज**

| | | अधिकारी यांचे नांव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र ज्या अधिकाऱ्याकडे दाखल करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे ठिकाण | श्री.राहुल इंगळे,मुख्याधिकारी माणगाव नगरपंचायत | माणगांव नगरपंचायत ता.माणगांव, जि.रायगड |
| २ | नामनिर्देशन स्वीकारणेचा दिनांक/वेळ | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत | |
| ३ | पिठासिन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) दुपारी २.०० नंतर | |
| ४ | नामनिर्देशन पत्रे फेटाळण्यांत आलेली आहेत त्या उमेदवाराची नावे आणि नामनिर्देशन पत्रे फेटाळण्याची कारणे सूचना फलकावर प्रसिद्ध करणे | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | |
| ५ | पीठासीन अधिकाऱ्याचे निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्यांचा कालावधी | दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार) सायंकाळी ५.०० पासून ते दिनांक ०८/०२/२०२२ रोजी (मंगळवार) सायंकाळी ५.०० वाजेपयर्यंत | |
| ६ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी सुचना फलकावर प्रसिद्ध करणे | दिनांक ०८/०२/२०२२ (मंगळवार) सायकांळी ५.०० नंतर | |
| ७ | उमेदवारी मागे घेणे | दिनांक ०९/०२/२०२२ रोजी (बुधवार) सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | |
| ८ | उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे (वर्णानुक्रमे) | दिनांक ०९/०२/२०२२ (बुधवार) दुपारी ४.०० नंतर | |
| ९ | अध्यक्ष व पदासाठी निवडणूक विशेष सभा दिनांक वेळ | दिनांक १०/०/२०२२ (गुरूवार) दुपारी १२.०० वाजता | |
| १० | निवडणूक लढविणाऱ्या व उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे विशेष सभेत वाचून दाखविणे | दिनांक १०/०२/२०२२(गुरूवार) दुपारी १२.०५ नंतर | |
| ११ | अध्यक्ष पदाची निवडणूक घेणे व निकाल घोषीत करणे | दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार) दुपारी १२.१० नंतर | |

ठिकाणः रायगड
दिनांकः ३१/०१/२०२२
सही/-
(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी, रायगड
अलिबाग

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र चौ मी. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. नरेंद पुनमचंद शाह | ८६/३ | २२७.०० चौ.मी. | २२-७० |

तरी, वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कुळमुखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि.०१/०२/२०२२
**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत,जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

# पावसाळ्यात वाहून गेलेल्या कालव्यांमुळे भातशेतीत अडथळे

## दुरुस्ती करण्याची आवश्यकता | दुबार शेतीसाठी पाणी नाही





। नेरळ । वार्ताहर ।
दरवर्षी राजनाला कालव्याचे पाणी भाताची शेती करण्यासाठी सोडले जाते. यावर्षी २०२१ च्या पावसाळ्यात कालव्यांना पडलेल्या खांडी लक्षात घेऊन त्यांची दुरुस्ती वेळेवर झाली नाही आणि त्यामुले दुबार शेतीसाठी पाणी येणार नाही. दरम्यान, ३५ गावातील २५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणाऱ्या राजनाला कालव्यांची दुरुस्ती करणे गरजेचे असताना पाटबंधारे विभागाच्या यांत्रिकी विभागाने मशिनरी दिली नाही आणि त्यामुळे यावर्षी जानेवारी महिना संपायला आला तरी कालव्यात पाणी खळाळत नाही.

टाटा कंपनीच्या आंध्र धरणाच्या पाण्यावर राजनाला कालवा बांधण्यात आला आणि त्या पाण्याचा वापर शेतीसाठी होऊ लागला. त्याचवेळी कालव्याचेपाणीबाराहीमहिनेअसल्याने मोठ्या प्रमाणात फार्महाऊस या टाटा परिसरात उभे राहिले. कालव्याच्या पाण्यावर हा भाग सुजलाम सुफलाम झालेला असतांना कालव्याची दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली. दुरुस्तीसाठी २०११ मध्ये कालव्यात पाणी सोडण्यात आले नाही, परिणामी एक वर्षासाठी बंद ठेवण्यात आलेले पाणी दुरुस्तीचे काम वेळेवर झाले नसल्याने सलग तीन वर्षे बंद ठेवले गेले. त्यामुळे २१०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणाऱ्या राजनाला कालवा परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक बनल्या होत्या. त्यामुळे मुख्य कालवे ओसंडून वाहत असतांना त्याचे पाणी शेतीसाठी वापरले गेले नाही असे काहीसे विदारक चित्र कर्जत तालुक्यात राजनाला कालवा परिसरात दिसून येत आहे.तसेच चित्र यावर्षी निर्माण झाले आहे.

तालुक्यातील पूर्व भाग हिरवागार करणाऱ्या राजनाला कालवा परिसरात २०२१ च्या पावसाळ्यात अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणात कालव्यांना खांडी पडल्या होत्या. त्यामुळे राजनाला कालव्याच्या मुख्य कालवा, उजवा कालवा आणि पाली पोटल कालवा पाणी सोडले गेले नाही, परिणामी अद्याप पर्यंत एकूण क्षेत्र पैकी कोणत्याही भागात राजनाला कालव्याचे पाणी सोडले गेले नाही. २०२१ च्या पावसाळ्यात तब्बल १२५ ठिकाणी मोठ्या खांडी पडल्या आहेत. त्या १५ ठिकाणी कालव्यांच्या मातीचा भराव वाहून गेलं आहे. त्यामुळे ती सर्व कामे करून घेण्याची मागणी स्थानिक शेतकरी ऑक्टोबर २०२१ पासून करीत होते. मात्र पाटबंधारे खात्याची उदासीनता यामुळे अद्यापपर्यंत कामी पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यामुळे डिसेंबर महिन्यात दुसऱ्या आठवड्यात कालव्यात सोडले जाणारे पाणी अद्याप सोडले गेले नाही. त्याचा परिणाम भाताच्या शेतीचा हंगाम निघून गेला आहे. मात्र या भागात राजनाला कालव्याला पाणी आलेच नाहीतर मात्र या भागातील जनावरे, विहिरी, बोअरवेल यानं देखील पाण्याचा तुटवडा जाणवणार आहे.आणि सदैव हिरवागार असलेल्या राजनाला कालव्याचा ३५ गावांचा परिसर पाणीटंचाई सदृश होणार आहे.

वाहून गेलेल्या कालव्याच्या खांडी लवकर भराव्यात आणि राजनाला कालव्याची पुन्हा बांधणी व्हावी यासाठी काढलेल्या निविदा यांना उशीर झाल्याने शेतकरी वर्गाला डिसेंबर महिन्यात भाताची शेतीसाठी पाणी मिळाले नाही. त्यात कालव्यांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाकडून पाटबंधारे विभागाचा यांत्रिकी विभाग निविदा काढून कामे करून घेत असतो. मात्र यावर्षी पाटबंधारे खात्याच्या पुणे येथील यांत्रिकी विभागाने कर्जत तालुक्यातील राजनाला कालव्याच्या कामासाठी अवजड मशीन उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील राजनाला कालव्याची दुरुस्ती नोव्हेंबर महिन्यात झाली आणि परिणामी कालव्यांना पडलेली भगदाडे बंद करता आली नाहीत आणि त्यामुळे कालव्यात पाणी सोडता आले नाही. डिसेंबर महिन्यात पाणी सोडले तर भाताची शेती करता येते, मात्र जानेवारी महिना संपण्याची वेळ आली तरी राजनाला कालव्याच्या मुख्य नाला, तसेच उजवा आणि डावा कालव्यात पाणी सोडले गेले नाही आणि त्यामुळे कुठेही जमीन ओलिताखाली आली नाही. या भागातील शेतीकारी पावसाळ्यात झालेल्या भातपिकाच्या नुकसानीमुळे उन्हाळी हंगामातील भाताची शेती करण्यासाठी दुबार पीक घेता यावे यासाठी पाण्याची वाट पाहत होते.

मात्र शेतकरी पाटबंधारे विभागाला कालव्यांना पडलेल्या खांडी पाटबंधारे विभागाने तात्काळ भरण्याची कार्यवाही का केली नाही? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

### ३५ गावांचा तारणहार...

टाटा च्या आंध्र धरणातून वीज निर्माण केल्यानंतर खाली सोडले जाणारे पाणी हे पेज नदी मधून वाहत जाते.तेच पाणी पुढे उल्हासनदी द्वारे कल्याणच्या खाडीला जाऊन मिळते.वीज निर्मिती झाल्यानंतर चे पाणी नदी मध्ये जात असताना त्या ठिकाणी राजनाला कालवा बांधून शेतीसाठी वळविले गेले आहे.ते पाणी ज्या ठिकाणी मुख्य कालव्यातून उजवा,डावा आणि पोटल कालव्यात सोडले जाते.तेथे कालव्यात घातलेला बांध जेसीबी मधून च्या साहाय्याने खोदून पाणी राजनाला कालव्यात सोडण्यात येत असते. कालव्यांना सर्वत्र पाणी दिसत असून शेत देखील ओली होऊन त्या भागात पुन्हा एकदा हिरवळ उगविण्यास सुरुवात झाली आहे.

---

## महत्त्वाचे



### आपटा उपसरपंचपदी मयूर शेलार

। रसायनी । वार्ताहर ।
रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा या ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी असणारे वृषभ धुमाळ यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच पद रिक्त झाले होते. या उपसरपंचपदाची निवडणूक आपटा ग्रामपंचायतीच्या कार्यालयात पार पडली. यावेळी उपसरपंच पदासाठी शेकापचे मयुर शेलार यांनी अर्ज दाखल केला होता. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामसेवक नवनाथ शेडगे यांनी काम पाहिले. उपसरपंचपदी मयूर शेलार यांची निवड होताच कार्यालयाबाहेर मयूर शेलार यांच्या चाहत्यांनी आनंदोत्सव साजरा केला. दरम्यान, आपटा ग्रामपंचायतीच्या सरपंच निकीता भोईर यांनीही राजीनामा दिल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

### ज्येष्ठ नागरिक संस्थेस मिळाले हक्काचे कार्यालय

। कर्जत । वार्ताहर ।
कर्जतमधील ज्येष्ठ नागरिक संस्थेस कार्यालय नव्हते, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी एखादे कार्यालय मिळावे अशी मागणी अनेक वर्षापासून ते नगरपरिषदेकडे करत होते. त्यांना नगरपरिषदेने कार्यालय उपलब्ध करून दिले, कार्यालयाचे हस्तांतर, वचनपूर्ती सोहळा संपन्न झाला. नगर परिषद हद्दीतील नानामास्तर नगर मुद्रे तेथे असलेल्या व्यायाम शाळा नगरपरिषदेने ज्येष्ठ नागरिक संस्थेचे कार्यालय उपलब्ध करून दिले आहे.

---


# माणगावात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम साजरा





। माणगाव । वार्ताहर ।
माणगाव तहसील कार्यालयात दि.२७ व २८ जानेवारी दोन दिवसमराठी भाषा संवर्धन कार्यक्रम साजरा झाला. हा उपक्रम हा माणगाव तहसीलदार प्रियांका आयरे यांनी शिक्षण विभागावर दाखवलेल्या विश्वासाचे अद्भूत दर्शनच या कार्यक्रमातून दिसून आले. गटशिक्षण अधिकारी सुनिता पालकर यांनी तालुक्यातील विनया जाधव यांना या कार्यक्रम आयोजनात सर्व तालुक्यातील सक्रिय शिक्षकांना घेऊन यशस्वी करण्याची जबाबदारी दिली. ज्यामुळे तालुक्यातील सर्व उत्साही शिक्षकाचा सुवर्ण संधी मिळाली. या कार्यक्रमात केंद्रप्रमुख संजय निजापकर, नरेंद्र खैरे, सुरेश म्हात्रे, निलेश साळवी, सुनील गोरेगावकर, पालवे, सावंत गुरूजी, खैरे गुरूजी तसेच अपूर्ण जंगम यानी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ग्रंथदिडीचा सन्मान विनया जाधव यांना मिळाला. या कार्यक्रमात रा.जि.प.शाळा उतेखोलवाडीचा मोलाचा वाटा आहे. शाळा बामणोली शिक्षक सुधा मोरे सहभाग घेतला. प्रांताधिकारी प्रशाली जाधव दिघावकर, शेखर देशमुख, नायब तहसीलदार बी.वाय.भाबड, सुनीता पालकर यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेवून शिक्षकवृंदासोबत आनंद लुटला.

# कर्जतची खुशी हजारे झळकणार चित्रपटात



। कर्जत । वार्ताहर ।
कर्जतमधील कलाकार खुशी हजारे 'आपडी थापडी' या चित्रपटातुन पुन्हा एकदा पडद्यावर झळकणार आहे, श्रेयस तळपदेच्या मुलीची भूमिका साकारणार आहे खुशी हजारे, ही बालकलाकार ऐश्वर्या राय सोबत काम केले होते.

श्रेयस तळपदेने त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी आपल्या आगामी चित्रपटाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. बऱ्याच कालावधीनंतर तळपदे मराठी सृष्टीकडे वळलेला पाहायला मिळाला. लवकरच श्रेयस 'आपडी थापडी' या चित्रपटातुन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करण्यात आले आहे. या चित्रपटात श्रेयस तळपदे सोबत अभिनेत्री मुक्ता बर्वे मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

चित्रपटासोबतच खुशीने टीव्ही जाहिरात क्षेत्रात देखील काम केले आहे. खूप लहान असतानाच खुशीने पॅम्पर्स पॅन्टच्या अ‍ॅडमध्ये काम केले होते. ही तिची पहिली अ‍ॅड ठरली होती. गोल्डी गुलाबजाम, लेन्सकार्ट तसेच नुकतीच ब्रिटानिया गुड्डेची एक नवी अ‍ॅड टीव्हीवर पाहायला मिळाली. या अ‍ॅडमध्ये खुशी देखील झळकली आहे. त्यामुळे खुशी एक बालकलाकार म्हणून बॉलिवूड तसेच मराठी सृष्टीत चांगलीच ओळखली जाऊ लागली आहे. आपडी थापडी या चित्रपटानिमित्त खुशी हजारे हिला खूप खूप शुभेच्छा.

---

# दिपक कुलकर्णी, सुरेंद्र टेमकर यांची सेवानिवृत्ती





। भाकरवड । वार्ताहर ।
को. ए. सो. ना. ना. पाटील हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पोयनाडचे डी. पी. कुलकर्णी, सुरेंद्र टेमकर यांचा सेवानिवृत्ती समारंभ नुकताच संपन्न झाला. को. ए. सो. तील ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर डी पी कुलकर्णी तर ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सुरेंद्र टेमकर नियत वयोमानानुसार ३१ जानेवारी २०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल त्यांचा सत्कार समारंभ संचालक पंडित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सदर कार्यक्रमासाठी राजिप सदस्या भावनाताई पाटील, युवा नेते सुप्रभात पाटील, आंबेपुर सरपंच सुमनताई पाटील, उपसरपंच ममता पाटील, को. ए. सो. सहमुख्यकार्यकारी अधिकारी अशोक गावडे, शाळा समिती सदस्य यशवंत पाटील, स्वप्नील पाटील, एस के पाटील, प्रकाश म्हात्रे, दीप्ती कुलकर्णी, संगीता टेमकर, डॉ. जुईली व त्यांचे कुटुंबीय, तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी देवेंद्र पाटील, प्रकाश गोलीपकर, तृप्ती पिळवणकर, अविनाश पाटील, विकास पाटील, सुवर्णा पाटील तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# एसटीसाठी करावी लागते प्रतिक्षा

। सुतारवाडी । वार्ताहर ।
गेले चार महिने एस.टी. च्या संपामुळे अनेक प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे. मात्र काही दिवसांपूर्वी काही मार्गावर थोड्या प्रमाणावर एस.टी. च्या गाड्या सोडण्यात आल्या आहेत. मात्र या एस.टी. च्या गाड्या एका तासाने एक अशा पद्धतीने एस.टी. मार्गक्रम करत असल्यामुळे त्याचप्रमाणे ठराविक वेळेत गाड्या येत नसल्यामुळे प्रवाशांची अगदी तुरळक गर्दी एस.टी. स्टॅन्डमध्ये पाहवयास मिळत आहे. मात्र एस.टी. स्टॅन्ड च्या बाहेर अनेक प्रवासी खासगी वाहनांनी प्रवास करण्यासाठी आणि मिळेल त्या वाहनांतून प्रवास करणे पसंत करत आहेत.

# नवोदित लेखकांसाठी वडघर येथे कार्यशाळा



। माणगाव । वार्ताहर ।
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,महाराष्ट्र व कोमसाप शाखा-उरण यांचे संयुक्त विद्यमाने रविवार दि.३० जानेवारी रोजी नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर येथे संपन्न झाली.या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी को.म.सा.प.रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय गुंजाळ होते. सुखद राणे,गणेश कोळी,अँड. गोपाळ शेळके, प्रशांत देशमुख, उपस्थित होते. हा कार्यक्रम तीन सत्रात पार पडला. मच्छिंद्र म्हात्रे, हेमंत बारटक्के, प्रशांत देशमुख, नायब तहसिलदार संजय माने, गणेश कोळी, अरुण इंगवले, संध्या देवकर,नामदेव बरतोड, डॉ. राजेंद्र राठोड ज्योत्सा राजपूत, शाहिर गंगाधर साळवी, अजित शेडगे यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. कविसंमेलनात २० कवींनी सहभाग घेतला होता. समारोप सत्रात अध्यक्ष जिल्हा समन्वयक अ.वि.जंगम यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी हेमंत बारटक्के यांच्या आभार प्रदर्शनाने केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# माणगावात १३ कोरोनाग्रस्त

। माणगाव । वार्ताहर ।
संपूर्ण जगात गेली वर्षभरापासून हैदोस माजविणाऱ्या कोरोना महामारीमुळे सर्वजण जेरीस आले आहेत.या महामारीची दुसरी लाट दोन महिन्यापासून आली असून रायगड जिल्ह्यात याचा प्रादुर्भाव हळूहळू वाढू लागला होता. पण सध्याची परिस्थिती पाहता मागील दोन ते तीन महिन्यापासून कोरोनाचा वेग हा हळूहळू कमी झाला होता पण नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच रुग्णांची संख्या कमी न होता याचा वेग वाढताना दिसत आहे. माणगाव तालुक्यात दि.३० जानेवारी २०२२ रोजी १३ नवे कोरोनाग्रस्त रुग्ण आढळले असून २० रुग्ण बरे झाले आहेत,

---

# महाड भाजी मार्केटमध्ये स्वच्छता गृहाची मागणी



। महाड । वार्ताहर ।
महाडमध्ये गेल्या १० वर्षापासुन महाड नगरपालिका हद्दीतील भाजीमार्केटमध्येस्वच्छता गृहाची व्यवस्था नसल्यामुळे भाजीमार्केट मधील टपरीधारक गाळेधारक हातगाडीवाले आणि बाजारात येणारे ग्राहक यांची गैरसोय झालेली आहे. परंतु अनेक वर्षे नगरपालिकेकडे मागणी करुन सुद्धा नगरपालिकेने लक्ष दिले नव्हते. तरी सगळ्या व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन महाड शहरातील प्रसिद्ध जुनी मंडई एरियात अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या स्वच्छतागृहाच्या मागणी साठी येथील व्यापारी मित्रांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले. त्या प्रसंगी पत्रकार पराग वडके, जुनेद तांबोळी, सचिन नाझरे, नानु लाले, विजय पवार विश्वास भालेकर हे उपस्थित होते.

# घारापुरी पर्यटनस्थळाला स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करा



। उरण । वार्ताहर ।
उरण तालुक्यातील घारापुरी (एलिफंटा) हे जागतिक कीर्तीचा दर्जा लाभलेले पर्यटन क्षेत्र आहे. समुद्राच्या चारही बाजूने वेढलेले हे बेट आहे. त्या अनुषंगाने समुद्राची सफर तसेच कोरीव लेणी पाहण्यासाठी बेटावर देश-विदेशातून पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात आणि घारापुरी (एलिफंटा) येथील ग्रामस्थांचा उदरनिर्वाह हा १०० टक्के पर्यटनावर अवलंबून असतो. पर्यटक हेच एकमेव रोजगाराचे व उपजीविकेचे साधन आहे. तसेच पर्यटकांव्यतिरिक्त बेटावरील ग्रामस्थांना अन्य कोणतेही रोजगाराचे साधन नाही. त्यामुळे शासनाने घारापुरी बेटाला स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करून पर्यटन सुरु ठेवून घारापुरीतील स्थानिक ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी घारापुरीचे सरपंच बळीराम ठाकूर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

देशात आणि राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढू लागल्यामुळे पर्यटन स्थळे बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परंतु एन हंगामात बंदी लागू केल्याने घारापुरी या पर्यटन क्षेत्रावर आधारित अर्थचक्र पूर्णतः ठप्प झाले आहेत. तसेच सरसकट पर्यटन क्षेत्र बंद केल्याने बेटावरील लोकल गार्ड, हस्तकला, वस्तू विक्रेते, लघु उद्योजक, स्टॉल धारक, हॉटेल व्यावसायिक तसेच पर्यटकावर आधारित बेटावरील सर्व भागधारकांवर रोजगाराविना उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे सरसकट बंदीऐवजी निर्बंधासह व्यवसाय करण्याची मुभा दिल्यास येथील ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होईल.

# खांब येथे मसाला बनविण्याचे प्रशिक्षण



। खांब-रोहा । वार्ताहर ।
नेहमीच समाजात विविधांगी उपक्रम राबविण्याऱ्या रोहश तालुक्यातील ग्रामपंचायत खांब व वसुंधरा कौशल्य विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वित्त आयोग अंतर्गत ग्राम पंचायत कार्यालयात महिलांसाठी मसाला बनविण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या प्रशिक्षणास खांब विभागातील बचतगट महिला, गृहिणी, तरुणी अशा १०० हून अधिक महिला व तरूणींनी उस्फुर्त सहभाग घेतला होता. तर प्रशिक्षणासाठी सहभागी महिलांना प्रशस्तीपत्रदेण्यात आले. याप्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी रंजना टवळे, मनोज शिर्के, सर्व सदस्य,सभासद महिला होत्या. या उपक्रमास महेश

---

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- WORK FROM HOME ९५०३०५८६२४
- ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- ब्लॉक विकणे श्रीबाग नं.२ (अलिबाग) येथे श्री-को-ऑप सोसायटीमधील तळ मजला 1RK 400 स्क्वे.फुटचा ब्लॉक विकणे आहे. संपर्क- रमेश जैन- 7249041883 / 9764520830


जाहिरातीसाठी संपर्क
(०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# गारव्याने खवय्यांच्या खिशालाही चाट, मासळीऐवजी चिकनचा पर्याय

## मासळीची आवक घटली







। उरण । वार्ताहर ।
मागील आठवडाभरात आलेल्या शीतलहरीमुळे समुद्रातील तापमानातही घट होऊन वातावरणात बदल झाल्याने मासळीच्या प्रमाणात ४० टक्क्यांपेक्षा अधिकने कमी आल्याने आवक घटली आहे. त्यामुळे बाजारातील मासळीचे प्रमाणच कमी झाल्याने मासळीच्या दरात वाढ झाली आहे. तर मांसाहारी लोकांनी मासळीला पर्याय म्हणून चिकनचा पर्याय निवडला आहे.

वातावरणात तापमान वाढल्यास पुन्हा एकदा मासळीची आवक वाढण्याची अपेक्षा मच्छिमारांनी व्यक्त केली आहे.

उरण तालुका हा समुद्रकिनाऱ्यावर असल्याने येथील नागरिकांचे प्रमुख अन्न हे मासळी आहे. मात्र सध्या थंडीचा हंगाम सुरू झाला असून तापमानात घट झाल्याने गारवा निर्माण झाला आहे. याचा परिणाम मासेमारी व्यवसायावरही झाला आहे.

मासळी व्यवसाय हा वातावरणातील बदलांवर अवलंबून असल्याने अनेकदा बदललेल्या वातावरणामुळे मासेमारांना मासळी दुष्काळाच्या संकटाचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात पावसामुळे तसेच जिवाला धोका असल्याने मासेमारी बंद असते, तर थंडीच्या काळात गारठा निर्माण झाल्यास त्याचाही परिणाम मासेमारीवर होतो. अशाच प्रकारचे वातावरण उरण परिसरात तयार झाल्याने थंडगार वातावरणामुळे मासळीची आवक ४० टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात घटली असल्याची माहिती करंजा येथील मच्छिमारांनी दिली.

# महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त परिसंवाद

**। पनवेल । वार्ताहर ।**

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत आगरी शिक्षण संस्थेत मातृभाषेतून शिक्षण आणि स्वावलंबन या विषयाधारित परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांची मुलाखत घेण्यात आली. ही मुलाखत वाणिज्य विभागातील मोबिना गौस या विद्यार्थीनीने घेतली.

या परिसंवादात आगरी शिक्षण शाळा समितीच्या चेअरमन तथा कामगार नेत्या यांनी, महात्माजींनी आपल्याला स्वावलंबन आणि सत्याग्रहाचा मार्ग दाखविला असून, आपल्या मातृभाषेबाबतही आपण आग्रही असण्याचे प्रतिपादन केले आहे. याशिवाय मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे संबंधित विषयाचे आकलन चांगल्या प्रकारे होते व बौद्धिक स्तर उंचावतो, असेही मत श्रुती म्हात्रे यांनी व्यक्त केले. याशिवाय उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य पंकज भगत यांनी आपल्या मार्गदर्शनात गांधीजींचा वारसा चालवणाऱ्या अनुयायांविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

## शुध्दीपत्रक

याद्वारे हाशिवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.हाशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेचा सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या सन २०२१-२०२२ ते सन २०२६-२०२७ या कालावधीचा निवडणूक कार्यक्रम दिनांक २८ जानेवारी २०२२ रोजी 'दैनिक कृषीवल' या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या प्रसिध्द केलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये तिसऱ्या ओळीत टंकलेखनाच्या चुकीने कुसूंबळे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.कुसूंबळे या नावाचा उल्लेख झालेला आहे. त्या ऐवजी सदरचे नाव हाशिवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.हाशिवरे असे वाचण्यात यावे.

सही/-
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.राजेश कुमार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री.रविंद्र दुंदा पाटील उर्फ दाभणे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे-तिवणे, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३०/२ | ०-०४-०० | ०.०२ |

तदंगभुत सर्व हक्क हितसंबंध यासुध्दा

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, दान, लिज,बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व अन्य हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०२/२०२२

**ॲड.उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत,जि.रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वेल्हवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दत्तात्रेय बाळु म्हात्रे, रा.मु.वेल्हवली, पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या नावे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र(हे.आर.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| वेल्हवली<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ११० | ०-२२-३०<br>पो.ख.०-०२-५०<br>एकूण ०-२४-८० | ५.०० |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीखः ३१/०१/२०२२

सही/-
**ॲड.सोनाली कल्पेश गुरव**
रा.मु.पो.सासवने
ता.अलिबाग, जि.रायगड
मो नं. ९२६०२३४३१२

Adarsh Shikshan Prasarak Mandal's

**SHRI. BAPUSAHEB D.D. VISPUTE COLLEGE OF EDUCATION (B.Ed.)**

Plot No. 41, Sector- 15, New Panvel, Dist. Raigad- 410206

APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF

**PRINCIPAL**

FROM THE ACADEMIC YEAR 2021-22

**UN-AIDED**

The above post is open to all, however candidates from any category can apply for the post.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/CC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having Knowledge of Marathi will be perferred.

**"Qualification, Pay Scales and other requirment are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26 th March, 2019 and revised from time to time."**

**The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Application with full deatails should reach the **PRESIDENT, Adarsh Shikshan Prasarak Mandal's SHRI. BAPUSAHEB D.D. VISPUTE B.ED. COLLEGE, Adarsh, Plot No. 41, Sector-15, New Panvel, Dist. Raigad- 410206,** within 15 days from the date of publication of this advertisment. **This is University approved advertisment.**

Sd/-
**PRESIDENT**

ऑर्डर ५ रुल २० ए प्रमाणे
मा. सोनावणे साहेब यांचे कोर्टात

## जाहीर समन्स

**पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

स्पे. मु. नं.२३४/२०२१ ने.ता. ९/३/२०२२

श्री. भानुदास मारोतराव कांबळे ............. वादी

**विरूद्ध**

श्री. प्रल्हाद सहा ......... प्रतिवादी

प्रति, प्रतिवादी
श्री. प्रल्हाद सहा
वय- सज्ञान, धंदा- नोकरी
रा. सी-६७, पेट्रोकेमिकल टाउनशिप,
नागोठणे, जि.रायगड ४०२१०६.
**आणि**
द्वारा-
हलदिया पेट्रोकेमिकल लि.,
केशवा बिल्डींग, १०६-१०८,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व,
मुंबई ४०००५१.

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरूद्ध या न्यायालयात कराराची पूर्तता करणेकरिता दावा दाखल केला असून या दाव्यामध्ये सूनावणीकरिता पुढील तारिख दिनांक ०९/०३/२०२२ नियुक्त करण्यात आली आहे. . सदर दाव्याच्या सुनावणीकरिता प्रतिवादी यांस वरील पत्तावर समन्स आणि नोटीस काढल्या असता त्याची बजावणी होउ शकली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे. तरी या नोटीसद्वारे प्रतिवादी यांस कळविण्यात येते की, सदर दाव्याचे सुनावणीची पुढील तारिख ०९/०३/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजता नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सदर वेळेस तुम्ही स्वत: अगर तुमचे तर्फे तुमचे एजंट, वकील वगैरे यांचेमार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा तुम्हास सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी एकतर्फी घेउन योग्य तो निर्णय दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

पनवेल
दिनांक : १७/१/२२

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायाधीश, व.स्तर**
**पनवेल, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे तिवरे, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांची सदर मिळकतीचे विद्यमान मालक ब्रिजमोहन सोहनलाल कपील यांचेकडून विकत घेण्याचे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ९/१/अ/७/अ | ४८ | ९८७-०६ | ९८-७१ |

सदर मिळकतीवरील ग्रामपंचायत तिवरे घर नं.१६८ मिळकत

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०१/०२/२०२२
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स
मुद्रे, कर्जत रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणे येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे चांदई ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकाकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन नं | उपविभाग नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४८ | ७अ | ००-२४-०० | ०-२८ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक १ फेब्रुवारी २०२२

**ॲड.सौ.मयुरा दिपक बोटुंगले**
मो.नं. ८८८८४००२८२

**ॲड.दिपक गोविंद बोटुंगले**
शॉप क्रमांक ०४, जानकीनिवास,
पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर
ता.कर्जत जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे ताडवाडी,ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांची सदर मिळकतीचे विद्यमान मालक चंद्रहास के लाड व वैशाली चंद्रहास लाड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५२/१ | १२८ | ३८०-०० | ३८-०० |
| ५२/१ | १२९ | ४२२-०० | ४२-२० |

सदर मिळकतीवरील ग्रामपंचायत पाथरज घर नं.१९७८ क्षेत्र १८८५ चौ.फुट

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०१/०२/२०२२
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स
मुद्रे, कर्जत रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री.रामदास सुदाम पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे-वैजनाथ, ता.कर्जत, जि.रायगड येथील**

| स.नं./हि.नं | एकूण क्षेत्र(हे.आर.पॉ) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| ३६/५/ब | ०-४६-०० | ४-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीच्या व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांकः०१/०२/२०२२
मोबा.९८२२६९११०९

**ॲड.निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटपपत्र / करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र / करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे<br>११५ | दापोली<br>२५८ अ | ११३/१० | ०-२५-० | २००<br>चौ.मी.<br>प्रस्तावित | भूखंड क्र.ए-९, सेक्टर-१६, क्षेत्र २०० चौ.मी. | **कै. दत्तु ऊर्फ दत्तात्रेय लक्ष्मण जितेकर (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती चांगुणाबाई पंढरीनाथ पाटील<br>**२) कै. शंकर दत्तात्रेय जितेकर (मयत) यांचे वारस**<br>अ) श्रीमती लक्ष्मी शंकर जितेकर<br>ब) श्री. स्वागत शंकर जितेकर<br>क) श्रीमती श्रद्धा जगदिश भोपी<br>ड) श्री. स्वराज शंकर जितेकर<br>३) श्रीमती रंजना प्रदिप मोकल<br>४) श्रीमती मथुरा दिलीप ठाकुर<br>५) श्रीमती वत्सला मनोहर जितेकर<br>६) श्री. रविराज मनोहर जितेकर<br>७) श्रीमती महेश्वरी परमानंद ठोंबरे<br>८) श्रीमती अनिता प्रविण म्हात्रे<br>९) श्री. सुजित दत्तात्रेय जितेकर<br>१०) श्रीमती विजया रोहिदास म्हात्रे | |
| २ | तळोजा-<br>१०८६ | पेंधर<br>१/२००८ | २५०/१२<br>२६४/३<br>२६६/४ | ०-४३-०<br>०-५५-१<br>०-२५-० | ११००<br>चौ.मी. | भूखंड क्र.६, सेक्टर-१८, क्षेत्र १०९३.४८ चौ.मी. | **कै. वामन बाळाजीराव कदम (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. दिलीप वामनराव कदम<br>२) श्री. अशोक वामनराव कदम | निरंक |
| ३ | तळोजा-<br>१०६९ | पेंधर<br>१/२००८ | २५०/७<br>२६४/२ | ०-४२-०<br>०-५०-१ | ८००<br>चौ.मी. | भूखंड क्र.८७C, सेक्टर-२३, क्षेत्र ७९९.६८ चौ.मी. | **कै. शेवंताबाई यशवंत कदम (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. जयवंत यशवंत कदम<br>२) श्री. अनंत यशवंत कदम<br>३) श्री. राजेश यशवंत कदम<br>४) सौ. राजश्री रामचंद्र मोरे | निरंक |
| | | | | **ता. उरण, जि. रायगड** | | | | |
| ४ | नवघर/<br>७३४ | १३ब७६ | २२२/५ब | ०-०५-० | ४३.७५<br>चौ. मी.<br>पूर्णांकांत<br>४०<br>चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ५६, भूखंड क्र. २०४, क्षेत्र-४० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | **मालक- कैकुश्री होरमसजी भिवंडीवाला**<br>**कुळ - कै. नारायण पिटकूर कोळी ऊर्फ पाटील (मयत),**<br>**कै. यमुनाबाई नारायण कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. गणेश नारायण कोळी ऊर्फ पाटील<br>२) श्री. खंडू नारायण कोळी ऊर्फ पाटील<br>३) श्री. किसन नारायण कोळी ऊर्फ पाटील<br>४) सौ. महादूबाई पंढरी कोळी<br>**५) कै. पुष्पा गुरु कोळी ऊर्फ पुष्पा गुरुनाथ कोळी (मयत)**<br>**हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तीचे नाव हक्कसोडपत्रक उरन - २६५९/२०१९ द्वारे -**<br>**१. श्री. गणेश नारायण कोळी ऊर्फ पाटील**<br>**२. श्री. खंडू नारायण कोळी ऊर्फ पाटील**<br>**३. श्रीमती. महादूबाई पंढरी ऊर्फ पंढरीनाथ कोळी**<br>**४. कु. नंदिनी गुरुनाथ कोळी**<br>**५. कु. विशाल गुरुनाथ कोळी**<br>**६. कु. रोहित ऊर्फ रोहन गुरुनाथ कोळी**<br>**हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नांव व हक्कसोडपत्रानुसार लाभधारक -**<br>श्री. किसन नारायण कोळी | निरंक |
| | | | एकूण | ०-०५-० | | | | |
| ५ | पागोटे/<br>९९२ | ७१/<br>८५-८६ | १२२/३ | ०-१८-३ | १६०.१<br>चौ. मी.<br>पूर्णांकांत<br>१५०<br>चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. १५, भूखंड क्र. ६९, क्षेत्र-१५० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | **मूळ भूधारक- ऐतीबाई गोमा पाटील (मयत) यांचे वारस**<br>१. श्रीमती ताराबाई हरिश्चंद्र घरत<br>२. श्रीमती देऊबाई गोपीनाथ घरत<br>३. श्रीमती चंद्राबाई दत्ताराम पाटील<br>**कै.नागुबाई गोमा उर्फ गोमाजी पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. जगदीश गोमा उर्फ गोमाजी पाटील<br>२) श्री. रतन गोमा उर्फ गोमाजी पाटील<br>३) श्री. प्रदीप गोमा उर्फ गोमाजी पाटील<br>४) श्रीमती नलिनी गोमा उर्फ गोमाजी पाटील उर्फ नलिनी भालचंद्र पाटील<br>५) श्रीमती जयंती गोमा उर्फ गोमाजी पाटील उर्फ जयश्री महादेव पाटील<br>६) श्रीमती भिमा गोमा उर्फ गोमाजी पाटील ऊर्फ प्रभावती प्रकाश बंडा<br>७) श्रीमती रंजना मनोहर बंडा<br>**हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे हक्कसोड पत्र क्र. उरन- २८१/२०११ द्वारे-**<br>**१) श्रीमती नागुबाई गोमा पाटील (मयत)**<br>२) श्रीमती नलिनी गोमा उर्फ गोमाजी पाटील उर्फ नलिनी भालचंद्र पाटील<br>३) श्रीमती जयंती गोमा उर्फ गोमाजी पाटील उर्फ जयश्री महादेव पाटील<br>४) श्रीमती. भिमा गोमा उर्फ गोमाजी पाटील ऊर्फ प्रभावती प्रकाश बंडा<br>५) श्रीमती रंजना मनोहर बंडा<br>**हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे**<br>१ श्री. जगदीश गोमा उर्फ गोमाजी पाटील<br>२) श्री. रतन गोमा उर्फ गोमाजी पाटील<br>३) श्री. प्रदीप गोमा उर्फ गोमाजी पाटील | निरंक |
| | | | एकूण | ०-१८-३ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित जमिनीबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा/वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**
**सिडको/जनसंपर्क/४१०/२०२१-२२**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

## नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार
# ‘आयपीएल’चे प्लेऑफचे सामने

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या यंदाच्या स्पर्धेवरही कोरोनाचे सावट आहे. पण यंदाची स्पर्धा भारतातच व्हावी, यासाठी बीसीसीआयने चांगलीच कंबर कसली आहे. २०२० मध्ये आयपीएलची संपूर्ण स्पर्धा युएईच्या मैदानात पार पडली. गत हंगामाची सुरुवात भारतात झाली पण कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावानंतर स्पर्धा युएईला स्थलांतरित करण्याचा निर्णय घ्यावा लागला. पण यंदाची संपूर्ण स्पर्धा भारतात खेळवण्यासाठी बीसीसीआय



प्रयत्नशील आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी यासंदर्भात संकेत दिले आहेत.

आयपीएलच्या १५ व्या हंगामातील सर्व सामने महाराष्ट्रातील दोन शहरात खेळवण्यात येणार असल्याची चर्चा रंगली असताना आता यात गुजरातची भर पडल्याचे समोर येत आहे. महाराष्ट्रातील मुंबई-पुण्यासह जगातील सर्वात मोठे स्टेडियम असलेल्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आयपीएलचे महत्त्वपूर्ण सामने खेळवण्याचा विचार बीसीसीआय करत आहे. यासाठीच्या चर्चा देखील सुरु झाल्याचे समजते. आगामी आयपीएल स्पर्धेतील साखळी फेरीतील लढती या महाराष्ट्रात खेळवण्याचा विचार असून प्ले ऑफच्या लढती या अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्याचा विचार सुरु आहे. अद्याप बीसीसीआयने यासंदर्भात कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.गुरुवारी बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी संपूर्ण स्पर्धा ही भारतातच आयपीएल आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील मुंबई, नवी मुंबई आणि पुणे या तीन ठिकाणी आयपीएलचे साखळी फेरीतील सर्व सामने खेळवण्याची बीसीसीआयची योजना आहे. मुंबईतील वानखेडे आणि ब्रेबॉर्न स्टेडियम, नवी मंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियम आणि पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोशिएशनच्या गहुंजे स्टेडियमवर आयपीएल सामने खेळवले जाऊ शकतात. प्लेऑफचे सामने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवण्याचा प्लॅन बीसीसीआयने आखला आहे.

## मैदानी खेळ चालू करण्याची विविध क्रीडा संघटनाची मागणी

। उरण । वार्ताहर ।

जिल्ह्यातील मैदानी खेळ क्रिकेट, फुटबॉल, खोखो, बॅडमिंटन, कबड्डी खेळण्यास परवानगी मिळावी यासाठी विविध क्रीडा क्षेत्रातील संघटनांनी आता राजकीय पुढारी नेते, आजी माजी लोकप्रतिनिधी यांची भेट घेण्यास सुरवात केली आहे. सर्वच राजकीय पक्षाचे नेते पुढारी, लोकप्रतिनिधी यांना निवेदन देऊन उरण, पनवेल तालुक्यासह जिल्ह्यात मैदानी खेळ सुरु करावी अशी मागणी क्रीडा संघटना, क्रीडा प्रेमींकडून केली जात आहे.

पनवेल, उरण, पेण, अलिबाग, कर्जत, खालापूर परिणामी जिल्हा आणि त्याचप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रमध्ये क्रिकेट, फुटबॉल, खोखो, बॅडमिंटन, कबड्डी आदी मैदानी खेळ मोठ्या प्रमाणात खेळले जातात. या खेळाच्या विविध स्पर्धांच्या माध्यमातून शेकडो हजारो नागरिकांना विविध प्रकारे रोजगार उपलब्ध होत असतो. मात्र कोरोनाच्या नियमामुळे मैदानी खेळावर बंदी आल्याने या खेळावर अवलंबून राहणाऱ्या विविध घटकावर उपासमारीची वेळ आली आहे. खेळ खेळण्यासाठी लागणारे साहित्य टी शर्ट, ट्रॅक, पॅन्ट, बॅट, बॉल आदी साहित्य बनविणारे अनेक कारखाने जिल्ह्यात आहेत. त्यातील शेकडो कामगार रोजंदारीवर काम करत आहेत. जर हि मैदाने आणि खेळ बंद झाली तर त्यांना उपजीविका करणे खूपच कठीण जाईल.

खेळ खेळण्यासाठी लागणारे टी शर्ट, पँट, बॅट, बॉल, इतर साहित्याची विक्री करणारे अनेक दुकाने ओस पडतील. प्रत्येक दुकानात तीन चार माणसे असतात. अशी शेकडो लोकांची रोजगार बुडून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. खेळाच्या आणि स्पर्धेच्या माध्यमातून समालोचक, पंच, गुणलेखक, अपडेटर, लाईव्ह प्रक्षेपण वाहिनी अशा अनेक लोकांची कुटुंबे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या खेळावर अवलंबून आहेत. अगदी पाण्याच्या बॉटल पासून ते चायनीज गाडी, वडापाव, टपरी, चाय दुकान ढाबा यांचाही रोजगार या खेळावर, स्पर्धावर अवलंबून आहे. मैदानी खेळ हे स्वतःला फिट ठेवण्यासाठी, स्वतःची एम्युनिटी पॉवर वाढविण्यासाठी मदत करत असतात. शिवाय या खेळावर अनेक लोकांची पोट भरत असल्याने सदर मैदानी खेळावर, मैदानावर विविध स्पर्धावर कोरोनामुळे बंदी आणू नये यासाठी विविध क्रीडा संघटना, संस्था, क्रीडा रसिक प्रेमी, चाहते यांनी उरण, पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यात मैदानी खेळ, स्पर्धा, मैदाने सुरु करावी अशी मागणी विविध राजकीय पक्षाचे पुढारी, नेते, लोकप्रतिनिधी यांच्याकडे केली आहे.विविध क्रीडा, संघटनांनी रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बळीराम पाटील, पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे,खा. श्रीरंग बारणे, बबन पाटील, महेंद्र घरत यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना निवेदन देऊन उरण पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यात मैदानी खेळ सुरु करण्याची मागणी केली आहे.

## महत्त्वाचे
### मराठी भाषा दिनानिमित्त राजस्तरीय ऑनलाईन स्पर्धा

। उरण । वार्ताहर ।

कवी कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा दिन दि. २७ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून यावर्षी उरण तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था महाराष्ट्र व रायगड जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी भाषामाध्यम हे मराठी असून, निबंध कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून vitthalmamtabade2015gmail.com या ई-मेलवर पाठवावा. इयत्ता ५ वी ते ७ वी विषय -माझी आवडती भाषा मराठी, शब्द मर्यादा ५००. इयत्ता ८ वी ते १० वी, विषय -मातृभाषेचे महत्व , शब्द मर्यादा ८००. ११ वी ते १२ वी,विषय -२७ फेब्रुवारी मराठी राजभाषा दिन, शब्द मर्यादा १०००, पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, विषय-मराठी भाषेच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी विविध उपाययोजना, शब्द मर्यादा १२००. तर खुला गट विषय - मराठी भाषेचे वर्तमान आणि भविष्य, शब्द मर्यादा -१५००. या स्पर्धेसाठी नाव नोंदणी व अधिक माहितीकरिता श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे सुदेश पाटील (७२०८६३१००९), कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे (संपर्क क्र. - ९७०२७५१०९८) यांच्याशी संपर्क साधावा.

## विंडीज मालिकेसाठी शाहरुख, साई किशोर भारतीय संघात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारत विरुद्ध वेस्ट इंडिज ६ फेब्रुवारीपासून वन डे आणि टी २० सीरिज खेळवण्यात येणार आहे. या दोन्ही सीरिज जिंकण्यासाठी यावेळी टीम इंडियाला मास्टर प्लॅन तयार करायचा आहे. ६ फेब्रुवारीपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सामने होणार आहेत. टी २० आणि वन डे सीरिजसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. तर दुखापतीमुळे जखमी झालेला रोहित देखील फिट झाला आहे. तो आणि बुमराह पुन्हा एकदा मैदानात खेळताना



दिसणार आहे. बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला. संघात दोन तुफानी खेळाडूंना संधी दिली. हे खेळाडू काही बॉलमध्ये अख्खा सामना बदलवू शकतात यासाठीच ते ओळखले जातात.

शाहरुख खान आणि साई किशोर हे अतिशय स्फोटक खेळाडू मानले जातात आहेत. यांनी आयपीएलमध्ये देखील उत्तम कामगिरी केली आहे. शाहरुख खान आयपीएलमध्ये पंजाब किंग्जकडून खेळला होता. शाहरुख खानने खझङ २०२१ मध्ये ११ सामन्यात १५३ धावा केल्या. विजय हजारे ट्रॉफीमध्ये शाहरुख खानने तामिळनाडूकडून खेळताना ३९ बॉलमध्ये ७९ धावा केल्या, ज्यात सात चौकार आणि सहा षटकारांचा समावेश होता. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२१ च्या अंतिम सामन्यात तामिळनाडूने शेवटच्या बॉलवर सिक्स ठोकून विजय मिळवला.

## बोपण्णा-रामनाथन जोडीला दुसरे मानांकन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताची आघाडीची जोडी रोहन बोपण्णा आणि रामकुमार रामनाथनला टाटा महाराष्ट्र खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष दुहेरी विभागात दुसरे मानांकन लाभले आहे.

जानेवारीच्या सुरुवातीला ॲडलेड आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकावणाऱ्या बोपण्णा-रामनाथन जोडीची टाटा महाराष्ट्र स्पर्धेत सलामीला जेमी केरेटानी आणि निकोलस मोनरो या अनुभवी अमेरिकन जोडीशी



गाठ पडणार आहे. पुरुष दुहेरीत युकी भांबरी आणि दिव्हिज शरण, तसेच अर्जुन कढे आणि पुरव राजा या अन्य दोन भारतीय जोड्यांचाही सहभाग असेल. या विभागात ऑस्ट्रेलियाच्या ल्युक सेव्हिल आणि जोन-पॅट्रिक स्मिथ यांना अग्रमानांकन लाभले आहे.

## भारताच्या महान कर्णधारांमध्ये विराट कोहलीला स्थान नाही

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

विराटकोहलीनेनुकताचभारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला आहे. क्रिकेटच्या प्रदीर्घ फॉरमॅटमध्ये भारताचा सर्वात



यशस्वी कसोटी कर्णधार म्हणून त्याने हे पद सोडले. कोहलीने ६८ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले, त्यापैकी ४० सामने संघाने जिंकले. कसोटी इतिहासात भारतीय कर्णधार म्हणून विराटचा हा सर्वाधिक कसोटी विजयाचा विक्रम आहे.

विराट कोहलीने पुढील काही वर्षे कर्णधारपद कायम ठेवले असते, तर कदाचित तो जगातील सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार बनला असता. कर्णधारपदावरून पायउतार होण्याच्या विराटच्या निर्णयाने क्रिकेटविश्वाला धक्का बसला आहे.

मांजरेकर म्हणाले, जेव्हा तुम्ही कोहलीला पाहता तेव्हा त्याच्याबद्दल आवडण्यासारख्या बर्याच गोष्टी आहेत. या मालिकेपूर्वी जेव्हा भारत वांडरर्स कसोटी सामन्यात धोकादायक खेळपट्टीवर खेळत होता. भारताने ही मालिका ०-२ ने गमावली, पण कोहलीने चांगले नेतृत्व केले. मांजरेकर पुढे म्हणाले, विराटकडे हार न मानणारी वृत्ती आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये भारताचा पराभव झाला. मात्र अखेरच्या क्षणी विराट कोहलीच्या माध्यमातून भारतीय संघाने सामना वाचवण्याची शक्कल लढवली. पण शेवटी तुम्हाला परिणामांबद्दल बोलावे लागेल. निकाल येत नव्हते. मांजरेकर यांनी पुढे असा दावा केला, की विराट कोहली महान भारतीय कर्णधारांपैकी एक नाही. तुम्ही अशा युगात राहता जिथे खूप व्यासपीठे आहेत, त्यामुळे प्रसिद्धी जास्त आहे, पण भारतीय क्रिकेट १० वर्षांपूर्वी सुरू झाले नव्हते. माझ्या मते हे सर्व विराट कोहलीपेक्षा चांगले कर्णधार राहिले आहेत.

## केळवली प्रिमियर क्रिकेट लीगचा मानकरी
### ठरला दिया आँटो इलेव्हन संघ

। खोपोली । वार्ताहर ।

तरूणाईचा आवडता खेळ म्हणून प्रथमदा क्रिकेट खेळाकडे आवर्जून पाहिले जात आहे. क्रिकेट खेळाकडे तरुणांचा वाढत ओघ पाहता प्रत्येक ग्रामीण भागातील गावांमध्ये छोट्या खाणी क्रिकेट प्रिमियर लीग आयोजन केले जात आहे. नुकतेच पार पडलेल्या खालापूर तालुक्यातील केळवली गावात केळवली प्रिमियर लीग सामन्यांमध्ये प्रशांत दिसले यांच्या दिया आँटो इलेव्हन संघाने विजेत्या ट्रॉफीवर नाव कोरत गावातील चार संघामध्ये आपले वर्चस्व स्थापित केले आहे.

तरुणांचा क्रिकेट खेळाकडे दिवसेंदिवस कल वाढत चालला आहे. क्रिकेट खेळाची वाढती आकर्षकता पाहता सर्चव दिग्गज मंडळी मोठमोठया सामन्याचे आयोजन करत तरुणांना प्राधान्य देत आहेत. नुकतेच खालापूर तालुक्यातील केळवली गावातील



क्रिकेटप्रेमी मंडळी आपल्या गावातील तरुणांमधील दडलेली क्रिकेट खेळातील कला बाहेर निघावी, याकरीता आपल्याच गावातील तरुणांचे वेगवेगळे चार संघ निर्माण करुन केळवली प्रिमियर लीग ट्रॉफीचे आयोजन करीत गावातीलच खेळाडूंमध्ये रणसंग्राम लावले होते. या सामन्यामध्ये सचिन दिसले यांच्या भैरवनाथ इलेव्हन संघ, अदीप कर्णुक यांच्या मनस्वी इलेव्हन संघ, जितेंद्र दिसले यांच्या मराठा वारियर्स संघ तसेच प्रशांत दिसले यांच्या दिया आँटो इलेव्हन संघाने सहभाग दर्शवला असता अंतिम सामना हा प्रशांत दिसले यांच्या दिया आँटो इलेव्हन संघात व जितेंद्र दिसले यांच्या मराठा वारियर्स संघात झाल्याने या अटीतटीच्या लढतीत दिया आँटो इलेव्हन सर्वोत्कृष्ट खेळी करित केळवली प्रिमियर लीगच्या ट्रॉफीवर नाव कोरल्याने या विजयी संघास भव्य ट्रॉफी व रोख रक्कम देत सन्मानित केले जात असून उत्कृष्ट फलंदाज म्हणून अदीप कर्णुक, उत्कृष्ट गोलदांज जितेंद्र दिसले तर मालकावीर म्हणून प्रणित दिसले या खेळाडूंना आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

## अर्थसंकल्प २०२२ ची सोशल मीडियावर चर्चा



वर्षा मेहता

। अलिबाग ।

सोमवारी लोकसभेत आर्थिक सर्वेक्षण २०२१-२२ मांडले. सर्वेक्षण २०२२-२३ आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेसाठी अपेक्षित ८-८.५ टक्के विकास दर दर्शविते, जे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने अंदाजित केलेल्या GDP विस्ताराच्या अंदाजे ९.२ टक्क्यांपेक्षा कमी आहे.

SOCIAL MEDIA पडसाद

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सोमवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी संसदेला संबोधित करताना सांगितले की, महिला कॅडेट्सची पहिली तुकडी यावर्षी जूनमध्ये पुणेस्थित राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत दाखल होईल. देशातील मुलींची शिकण्याची क्षमता वाढवण्यासाठी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये लिंग समावेश निधीची तरतूद करण्यात आली आहे. देशातील सर्व ३३ सैनिक शाळांनी मुलींना प्रवेश देणे सुरू केले आहे, ही अभिमानाची बाब आहे.

सोशल मीडियावर लोकांनी अर्थसंकल्पाकडून त्यांच्या अपेक्षांबद्दल लिहिले. अनेकांनी सरकारवर टीका केली तर अनेकजण सरकारच्या बाजूने होते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी देशाला संबोधित करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, हे अधिवेशन भारताच्या आर्थिक विकासाचे जगाला दर्शन घडवेल, असे सांगितले.

## खांब क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजय भोसले

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील क्रिकेट खेळात अग्रेसर असलेल्या खांब विभागीय क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजय भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



खांब विभागीय क्रिकेट असोसिएशनची सभा सर्व क्रिकेट खेळाडू यांच्या विशेष सहकार्याने नुकतीच खांब येथे संपन्न झाली.यावेळी खांब, वैजनाथ, मुठवली, शिरवली, नडवली, चिल्हे, देवकान्हे, बाहे येथील सर्व क्रिकेटपटू बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी अजय भोसले, संदेश मोहिते, राहुल पोटफोडे, मनोज थिटे, विक्रम गुरव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून रोहित थिटे, कपिल बामणे, पिंट्या भोईर, तेजस सुटे, कल्पेश महाडिक, नितेश कोंडे, कल्पेश गोठम, विजय खांमकर, मंदार पार्टे, संकेत लहाने, स्वप्नील कापसे, प्रणय गोडबोले, आदींची प्रसंगी यावेळी पंचकमिटीवर निवड करण्यात आली. खांब विभागीय क्रिकेट असोसिएशन ही गेली अनेक वर्षे स्थानिक पातळीवर ग्रामीण भागात कार्यरत आहे तसेच या विभागातील युवकांना व इच्छुक क्रिकेट खेळाडूंना मार्गदर्शन करत विभागातील विविध पातळीवर क्रिकेट खेळाचे आयोजन करण्यात आले आहे.

## रोहित बरोबरची मैत्री विसरणार

। मुंबई । वृत्तसंस्था ।

नुकत्याच संपलेल्या टी-२० मालिकेत वेस्ट इंडिजने इंग्लंडचा ३-२ असा पराभव केला.

हा विजय वेस्ट इंडिजच्या संघासाठी बुस्टर डोस ठरणार आहे. कॅप्टन रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाविरुद्ध खेळण्यास मी खूपच उत्सुक आहे.

## ‘वळण’ पुरस्काराची सिल्व्हर ज्युबिली

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत येथील होतकरू कलावंत लेखक,दिग्दर्शक या भूमिकेत वावरणारे प्रदीप गोगटे यांनी वर्षभरापूर्वी निर्माण केलेल्या वळण या शॉर्ट फिल्मने सिल्व्हर ज्युबिली पर्यंत मजल मारली आहे. आंतराष्ट्रीय स्तरावर या शॉर्ट फिल्मने झेप घेतली असून कर्जत तालुक्यासाठी हा अविस्मरणीय क्षण आहे.

वळणचे शूटिंग करून एक वर्ष पूर्ण करताना २५ अवॉर्ड आणि २७ शॉर्टफिल्म फेस्टिव्हलमध्ये संन्मानित करण्यात आले आहे. २९जानेवारीला वळण या शॉर्ट




फिल्मचे रेकॉर्डिंग झाले होते आणि या शॉर्ट फिल्मने तब्बल नऊ आंतरराष्ट्रीय स्तरावरील अवॉर्डस मिळविले आहेत.उत्कर्ष इव्हेंट्सच्या या वळणने कर्जतचे नाव

### कर्जतचे नाव उंचावले

उंचावले असून या शॉर्ट फिल्मची निवड होण्याचा क्षण आयुष्यातला अविस्मरणीय क्षण आहे असे या शॉर्टफिल्मचे लेखक, दिग्दर्शक, निर्माते प्रदिप गोगटे मानतात. तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात २५ अवॉर्ड मिळवून शॉर्टफिल्म वळणने इतिहास रचला आहे.नवोदित कलाकार आणि बालकलाकार यांना खऱ्या अर्थाने व्यासपीठ देणारे गोगटे यांनी शॉर्टफिल्म वळणच्या माध्यमातून तालुक्याच नाव आतंरराष्टीय स्तरावर नेल आहे. सर्व स्तरातून टीमचे कौतुक होत आहे. २०२२ या वर्षात उत्कर्ष इव्हेंट्सच्या माध्यमातून व्यावसायिक नाटक, एकांकिका, शॉर्टफिल्म करण्याचा मानस गोगटे यांनी केला आहे. मुख्य म्हणजे वळण या पहिल्या शॉर्ट फिल्ममध्ये सर्व कलाकार हे स्थानिक आहे. वळण ही फिल्म प्रसिद्ध झाल्याने अनेक ठिकाणी पुरस्कार मिळत आहे .

शॉर्टफिल्म ‘वळण’चे शूटिंग कर्जत, आवळस, नेवाळी आणि खारघर येथे झालेली असून दोन दिवस आणि २९ तासांचे हे शूटिंग होते.

कृषीवल

## क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

- मुख्य संपादक





## भगवद्गीता स्पर्धा

हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन ‘हरे कृष्ण’ नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
*(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)*
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, ‘वृंदावन’ घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१
पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)